बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | बुधवार,दि.९ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक६७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## हरियाणाप्रमाणेच आता महाराष्ट्रातील

मुंबई:भारतीय जनता पक्षाने काँग्रेसचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भाजपा हरियाणात तिसऱ्यांचा सरकार स्थापन करणार आहे. दरम्यान, भाजपाच्या या विजयानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही यासंदर्भात प्रतिक्रिया देत हरियाणाप्रमाणेच महाराष्ट्रातही महायुतीचं सरकार येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. एकनाथ शिंदे यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत या निकालाबाबत प्रतिक्रिया दिली आहे. या निवडणुकीत जातीवाद हरला आणि विकास जिंकला. डबल इंजिन सरकारची विजयी घौडदौड कायम आहे. हरियाणातील जनतेने सलग तिसऱ्यांदा डबल इंजिन सरकारवर विश्वास दाखवला आहे.

जनसंवाद यात्रे दरम्यान बीडमध्ये कार्यकर्त्यांना संबोधन



## अनिलदादांसाठी बीड मतदार संघात अनुकूल:मुळूक

अनेक वर्ष सत्ता भोगून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या क्षीरसागर विरोधात बीडकर आता क्षीरसागर मुक्तीचा नारा देऊ लागले आहे त्यामुळे लबाड क्षीरसागरांना धडा शिकवण्यासाठी आणि या बीड मतदार संघाचा विकास करण्याकरिता अनिल दादा जगताप यांच्याशिवाय पर्याय उरलेला नाही व सध्या बीड मतदारसंघात सर्वोपरी अनिल दादा जगताप यांच्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे. यामुळे बीड मतदार संघावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा अनिल दादा जगताप यांच्या माध्यमातून फडकविल्या जाईल अशी भावना शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळक यांनी संसदरत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्यासमोर आपल्या भावना व्यक्त केल्या.



### खा.श्रीकांत शिंदे पोटतिडकीने म्हणाले

# शिंदे एकमेव असे मुख्यमंत्री ज्यांनी,जनतेचं हित पाहिले!

## लाडक्या बहिणी दादाला नक्कीच विधानसभेत धाडतील

## शिवसेना खा.डॉ. श्रीकांत शिंदेंची उबाठावर घणाघाती टीका

## महिलांचे हात बळकट करण्याचे ऐतिहासिक निर्णय

## अनिलदादा जगताप, सचिन मुळूक नक्की बदल घडवून आणतील

### झंझावात विधान भवनात पोहचला पाहिजे: अर्जुनराव खोतकर

बीड मतदारसंघांमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचा झंजावात सुरू झालेला दिसून येत आहे हा झंझावात विधानसभेच्या सभागृहात पोहोचविण्याकरिता आपल्या सर्वांना मोठ्या ताकदीने कामाला लागले पाहिजे. याबरोबरच सर्वसामान्यांचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी देखील सर्व शिवसैनिकांना शिवधनुष्य उचलण्याची गरज असून महाराष्ट्रावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकविण्यात आपले योगदान देणे अत्यावश्यक आहे. असे शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्क नेते अर्जुनराव खोतकर यांनी आपल्या भाषणात शिवसैनिकांना आवाहन केले.



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लाडक्या बहिणींना सक्षम करण्याचे काम सरकारने केले मात्र काहीजणांना आता प्रचंड पोटात दुखायला लागलंय. अडीच वर्ष सरकार असताना स्वत: घरी बसले आणि लोकांनाही घरी बसवले, अशी घणाघाती टीका शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उबाठावर केली. लाडकी बहिण योजनेने पोटशूळ उठलेल्या सावत्र भावांना निवडणुकीत महिला जागा दाखवतील, असे ते म्हणाले. जनसंवाद यात्रेच्या चौथ्या टप्प्यात आज बीड येथील शिवसेना पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. पान २ वर...

### मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात:अनिल जगताप

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे.

बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्यची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे आशीर्वाद आणि डॉ श्रीकांतजी शिंदे साहेबांचे सहकार्य आपल्यासोबत आहेत त्यामुळे आपला विजय पक्का आहेच आता तुम्ही कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा.अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा जन संवाद दौरा मेळाव्यात केले.

## बीडमध्ये आंबेडकरी जनतेचा मोर्चा

### पत्रकार परिषद: कायदा सुव्यवस्था निर्माण झाल्यास पोलीस जबाबदार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आंबेडकरी जनतेने बीड रेल्वे स्टेशनला भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले असून सदरील नाव राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी नोंदवून घ्यावे. यासाठी आंबेडकरी समूहाची मागणी आहे. त्या संदर्भात बुधवार (दि.९) ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हजारो आंबेडकरी समूहाकडून मोर्चा काढला जाणार आहे. तशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी पोलीस प्रशासन यांना गेल्या १ तारखेला देण्यात आले आहे. मात्र पोलिसांनी मोर्चाच्या पूर्वसंध्येला




परवानगी नाकारली आहे.

त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था निर्माण झाल्यास याला बीड पोलीस जबाबदार असतील असा आरोप आंबेडकरी जनतेने बीड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत केला.पत्रकार परिषदेमध्ये आंबेडकरी जनता म्हणाली की, काढण्याच्या बाबतीत बीड जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले होते मात्र पोलीस पान २ वर...

## मुकबधीर महिलेवर अत्याचार!

### कारवाई:नात्यातील व्यक्तीने केला अत्याचार

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

एका ४३ वर्षीय मूकबधीर महिलेवर नात्यातील व्यक्तीनेच अत्याचार केल्याची घटना सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास केज तालुक्यात घडली.

या बाबतची माहिती अशी, केज तालुक्यातील एका गावात एक विवाहित मूकबधीर महिला आपल्या आई-वडिलांबरोबर राहते. तिचे आई-वडील शेतमजुरीचे काम करत असून सोमवारी दि सात ऑक्टोबर रोजी सोयाबीनची कापणी करण्यासाठी ते दुसऱ्याच्या शेतात गेले होते. यादरम्यान ही महिला घरात एकटीच असल्याचे पाहून नात्यातील एका नराधमाने दुपारच्या सुमारास घरात घुसून तिच्यावर अत्याचार केला. ही बाब पीडितेच्या चुलतीच्या निदर्शनास येताच नराधम तेथून पान २ वर...

## हरियाणा निकालानंतर पतप्रधान मोदींची टीका

### निकाल : काँग्रेसचा डबा गुल झाला, पितळ उघडं पडलं!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

हरियाणा निवडणुकीत भाजपाला उत्तम यश मिळालं. ज्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात भाषण करताना काँग्रेसला टोले लगावले आहेत. तसंच जम्मू काश्मीरच्या निकालाचाही मी सन्मान करतो असंही मोदी यांनी म्हटलं आहे. हरियाणातला विजय ऐतिहासिक आहे. या विजयाने आपल्याला खूप आनंद झाला



आहे असं म्हणत असतानाच काँग्रेससाठी अनेक राज्यांनी नो एंट्रीचा बोर्ड लावला आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे. तसंच काँग्रेसचा डबा गुल झाला आहे अशी बोचरी टीकाही त्यांनी केली आहे.हरियाणातल्या जनतेने तिसऱ्यांदा भाजपावर विश्वास टाकला आहे. तसंच आम्हाला भरभरुन मतदान केलं आहे. हरियाणातल्या जनतेने इतिहास ( क्रीूरपर ठर्शीश्री ) रचला आहे. आपल्या देशात अनेक राज्यं पान २ वर...

**दुर्घटना** भूमिका: नारायणगड येथे मनोज जरांगे पाटलांचा दसरा मेळावा

## गेवराई नेत्यांकडून दसरा मेळाव्याला साखरेचा ट्रक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिरुर तालुक्यातील नारायणगड येथे १२ ऑक्टोबर रोजी दसरा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या दसरा मेळाव्यात राज्यभरातील मराठा बांधव लाखोच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. देशातील सर्वात मोठा हा मेळावा असणार आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील या दसरा मेळाव्यातून मराठा समाजाशी पुन्हा एकदा संवाद साधणार आहेत.या ठिकाणी येणाऱ्या मराठा बांधवांची योग्य सोय करण्यात आली आहे. समाजातील अनेक घटकांकडून नाव घोषित न करता मदत पुरविली जात आहे. त्यामध्ये





गेवराई मतदार संघाचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी तुळजाभवानी साखर कारखान्याकडून साखरेच्या पोत्याचा एक ट्रक नारायणगड येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यास दिला आहे. त्यामुळे गेवराई मतदार संघात त्यांचे कौतुक होत असल्याच्या चर्चा नागरिकांतून उमटत आहेत.

मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी मनोज जरांगे पाटील जीवाचे रान करत आहेत. त्यांची प्रत्येक सभा रेकॉर्ड ब्रेक झालेली आहे. नारायण गड येथे होत असलेला दसरा देखील रेकॉर्ड ब्रेक असणार आहे. या मेळाव्यात मराठा समाजातील अनेक घटकांकडून विविध प्रकारची मदत करून सामाजिक दायित्व निभावले जात आहे.जो नेता, नारायणगडावर दिसणार नाही तो निवडणुकीत पडल्याशिवाय राहणार नाही, या भूमिकेतून सोशल मीडिया वरती पोस्ट फिरत आहेत. मात्र पान २ वर...

## ममता मत्स्य संस्थेच्या विरोधात उपोषण

### दुर्लक्ष:८ लाखांचा अपहार केल्याचा आरोप

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

वेळोवेळी कोणत्या न कोणत्या कारणावरून वादाच्या भोवऱ्यात असणारी ममता मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था पुन्हा एकदा वादाच्या भवऱ्यात सापडली आहे या संस्थेच्या संचालक मंडळाचे विरोधात अनेक वेळा तक्रारी व अनेक वेळा उपोषणही करण्यात आली. गेंड्याची कातडी पांघरलेली अधिकारी वेळोवेळी संस्थेच्या संचालक मंडळाच्या चुकांवर अर्थपूर्ण पांघरून घालण्याचे काम करत आले आहेत. त्याच्या विरोधात भोई समाजाचे गणपत खिरे हे सुकळी येथील गुणवती तलावाच्या पायथ्याशी आमरण



उपोषणाला बसले आहेत त्या संबंधित निवेदन कार्यलयास देण्यात आले होते. त्या निवेदनात नमूद करण्यात आले कि बोगस लेखापारीक्षण अहवाल तयार करून कार्यालयास सादर करणे, कोणत्याही प्रकारची नोटीस न देता बेकायदेशीरपणे सभासद कमी करणे संस्थेत नविन भोगस सभासद तयार करून संस्थेत सभासद म्हणून समाविष्ट करणे तसेच बोगस संचालक मंडळ तयार करून संस्थेच्या खात्यावरील सन २०२१-२०२२ पान २ वर...

## मंदावले ‘मेक इन’!

मेक इन इंडिया’कडून जी काही अपेक्षा व्यक्त केली जात होती, ती तितक्या प्रमाणात पूर्ण होताना दिसत नाही विख्यात अर्थतज्ज्ञ अमेरिकावासी जगदीश भगवती हे काही अमर्त्य सेन यांच्याप्रमाणे भारत सरकारचे टीकाकार नव्हेत. उलट आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या मान्यवरांनी विकासाचे ‘गुजरात प्रारूप’ डोक्यावर घेतले त्यांत भगवती यांचा समावेश होतो. त्यामुळे दशकभरापूर्वी ‘गुजरात प्रारूप’कर्त्यांकडे देशाची सूत्रे गेल्यानंतर अर्थव्यवस्थेसंबंधित काही महत्त्वाची जबाबदारी भगवती यांच्या हाती दिली जाईल असे मानले जात होते. ते का झाले नाही याची चर्चा नंतर कधी. तूर्तास भगवती यांनी भारत सरकारला केलेली सूचना महत्त्वाची ठरते. ‘‘जागतिक पुरवठा साखळीत (ग्लोबल सप्लाय चेन) भारताचा अंतर्भाव करावयाचा असेल तर सरकारला तातडीने पावले उचलावी लागतील’’, असे विधान भगवती करतात. या विधानास असलेली ‘मेक इन इंडिया’ या सरकारी कार्यक्रमाच्या दशकपूर्तीची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास भगवती यांच्या विधानाचे महत्त्व लक्षात येईल. ‘मेक इन’ हा विद्यमान सरकारचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम. दहा वर्षांपूर्वी सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस राष्ट्रीय स्तरावर तो हाती घेतला गेला आणि यंत्रातील चक्रे वापरून बनवण्यात आलेला सिंह हे त्याचे बोधचिन्ह लोकप्रिय ठरले. या ‘मेक इन इंडिया’ची तीन प्रमुख उद्दिष्टे होती. देशातील पक्क्या मालाचे उत्पादन करणाऱ्या कारखानदारीचा (मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर) विकासवेग प्रतिवर्षी १२ ते १४ टक्के इतका वाढवणे, या क्षेत्रात २०२२ पर्यंत १० कोटी इतके अतिरिक्त रोजगार तयार करणे आणि देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात या क्षेत्राचा वाटा २०२२ पर्यंत २५ टक्क्यांपर्यंत नेणे. हे सगळे करावयाचे कारण देशातील उत्पादने अधिकाधिक प्रमाणात जागतिक बाजारात जाऊन भारत ही भूमी चीनप्रमाणे जागतिक उत्पादनांचे कारखानदारी केंद्र बनावी. ‘मेक इन इंडिया’ची छाप जागतिक पातळीवर कशी पडेल यावर अलीकडेच चर्चा झाली. तथापि भगवतींसारख्या सरकार–स्नेही अर्थवेत्त्यासही जे काही झाले वा होत आहे ते पुरेसे नाही, असे वाटत असेल तर ‘मेक इन इंडिया’च्या दशकपूर्तीनिमित्त या योजनेचे प्रगतिपुस्तक मांडणे समयोचित ठरेल. आपल्या एकूण व्यापारापैकी जागतिक मूल्य साखळीशी निगडित प्रमाण यामुळे किती बदलले, हे त्यासाठी पाहावे लागेल. ही योजना हाती घेतली तेव्हा जागतिक मूल्य साखळीतील भारताच्या वाट्यापैकी आपल्या कृषी/ मत्स्योद्योग आदींचा हिस्सा २० टक्के इतका होता. गेल्या दहा वर्षांत तो वाढून २३ टक्के झाला. ज्यासाठी ही योजना हाती घेतली गेली त्या कारखानदारीचा हिस्सा २०१४ साली होता ४६.१ टक्के इतका. ‘मेक इन इंडिया’ची दशकपूर्ती होत असताना तो वाढून ५१.६ टक्के इतका झाल्याचे जागतिक बँकेच्या आकडेवारीवरून दिसून येते. म्हणजे या काळात कारखानदारी निश्चितच वाढली. नाही असे नाही. पण ही साडेपाच टक्क्यांची वाढ इतक्या डामडौलात साजऱ्या केल्या जाणाऱ्या योजनेचे फलित मानावी का हा प्रश्न. तो पडण्याचे आणखी एक कारण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचा वाटा २५ टक्क्यांपर्यंत नेणे हे ‘मेक इन इंडिया’चे उद्दिष्ट होते. त्याची सुरुवातीची २०२२ ही लक्ष्यपूर्ती मर्यादा तीन वर्षांनी वाढवून २०२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेतील कारखानदारीचा वाटा दहा वर्षांपूर्वी होता तितकाच तो आजही आहे. ‘बिझनेस स्टॅण्डर्ड’ वृत्तपत्राने याबाबत प्रकाशित केलेल्या सविस्तर वृत्तानुसार गेल्या दहा वर्षांत सेवा क्षेत्राची वाढदेखील जेमतेम दोन टक्के इतकीच झालेली दिसते. जागतिक मूल्य साखळीशी निगडित एकंदर भारतीय व्यापार–व्यवहारापैकी भारतीय सेवा क्षेत्राचा हिस्सा २०१४ साली २५.८ टक्के इतका होता. तो आता २७.८ टक्के इतका आहे.

गेल्या दहा वर्षांत दरडोई कारखानदारीचे उत्पादन (पर कॅपिटा मॅन्युफॅक्चरिंग आउटपुट) साधारण ४.८ टक्के इतके वाढले. परंतु या काळात बांगलादेश, व्हिएतनाम, चीन आदी आपल्या शेजारी देशांनी अनुक्रमे ९.५ टक्के, ७.८ टक्के आणि ५.७ टक्के इतकी वाढ नोंदली. यावर आपल्या तुलनेत बांगलादेश, व्हिएतनाम यांचा आकार तो काय, अशी प्रतिक्रिया उमटेल. ती योग्य. पण मग चीनचे काय, हा प्रश्न. आपल्यापेक्षा कित्येक पटींनी व्यापक असलेली चिनी कारखानदारी या काळात आपल्यापेक्षा अधिक गतीने वाढ नोंदवत राहिली. याचा परिणाम असा की जागतिक मूल्य साखळीत आपल्यापेक्षा आपले शेजारी देश अधिक चमकदार कामगिरी नोंदवताना दिसतात. तीही त्यांच्या त्यांच्या देशात ‘मेक इन’ सारखे काहीही कार्यक्रम राबवले जात नसताना! गेल्या दहा वर्षांत जागतिक मूल्य साखळीत भारतीय कारखानदारीचा, म्हणजेच भारतात तयार झालेल्या उत्पादनांचा, सहभाग मर्यादित राहिला तर व्हिएतनामादी देश आपल्यापेक्षा पुढे गेले. करोनाकाळानंतर चीनमधून मोठ्या प्रमाणावर उद्योग बाहेर पडतील आणि त्यांच्यासाठी भारत हे आकर्षण केंद्र असेल, असे मानले जात होते. म्हणजे चीनमधून निघाल्यावर हे उद्योजक थेट भारतात आपला तंबू टाकतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. ती काही तितक्या प्रमाणात पूर्ण होताना दिसत नाही. भारतापेक्षाही अनेक उद्योजकांनी व्हिएतनाम, मलेशिया आदी देशांत जाणे पसंत केले. परिणामी उद्योजकांच्या चीन–त्यागाचा फारसा उपयोग आपल्याला झाला नाही.

# बौद्ध राजकीय सत्तेपासून वंचित



सिध्दार्थ कांबळे

मो.९७६६२७५३५८

बौद्धांना राजकीय सत्तेपासून वंचित ठेवण्याचे काम दोन्ही राजकीय पक्ष तर करत नाहीत ना....विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की,गुलामाला गुलामाची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल... डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाला सांगितले जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा तुम्हाला या देशाची शासनकर्ती जमात बनवायचे आहे... डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेली ही गोष्ट आपण लक्षात घेऊन आज खरच आपण शासनकर्ती जमात बनलो आहोत का? याचे आत्मचिंतन करणे फार गरजेचे आहे.... आज या भारत देशामध्ये मोठ्या प्रमाणात जाती–पातीचे राजकारण चालू असून यामध्ये विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांनी आपल्या सोयीनुसार राजकारण खेळत काही विशिष्ट समाजातील लोकांचा राजकारणापुरता वापर करून घेत त्यांना असे दाखवायचे की,आम्ही या समाजाचे उध्दारकर्ते आहोत.म्हणत समाजाची दिशाभूल करण्याचे काम करत असतात. आणि मुळात ह्याच राजकीय पक्षांच्या राज्यकर्ते नेत्यांनी केवळ आणि केवळ फक्त बौद्ध समाजाचा कशा प्रकारे वापर करून घ्यायचा आणि त्यांना मिठाच्या खड्याप्रमाणे बाजूला करायचं हे ठरवून घेतले असून त्याला महाराष्ट्रातील बौध्द समाज मोठ्या प्रमाणात बळी पडला असून त्यामुळे या समाजाचे फार मोठ्या प्रमाणात राजकीय व सामाजिक नुकसान होत असून त्यामुळे बौध्द समाज ची होणारी राजकीय दुरावस्था पाहता बौध्द समाज राजकीय सत्तेपासून आजघडीला तरी राजकीय सत्तेपासून कोसोदुर असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात आपल्याला पाहायला मिळते.

भारताला स्वातंत्र मिळवून ७५ वर्ष झाले असून भारत देश स्वातंत्र्य झाल्यापासून ते आजपर्यंत बौद्धांना आपली राजकीय ताकत निर्माण करता आली नाही. त्यामुळे बौद्ध समाजाचा वापर काँग्रेसने मोठ्या प्रमाणात करून बौद्ध समाजामध्ये चुकीची अफवा पसरवून संविधान धोक्यात आहे संविधान बदलणार आहे. असा परपोगंडा चालवत आजपर्यंत फक्त काँग्रेसने मतांसाठी बौद्ध समाजाचा वापर करून घेतला आहे. आणि बौद्ध समाज पण काँग्रेसच्या भुलथापांना बळी पडत आपले राजकीय ताकद कमी करुन घेत राहिले हेच त्यांच्या लक्षात राहिले नाही. जेव्हा त्यांची राजकीय ताकद कमी होत चालली असून फक्त आणि फक्त एका विशिष्ट पक्षाचे आपण गुलाम बनत चाललो आहे. हे कधी बौद्ध समाजाच्या लक्षात आले नाही. त्यामुळे वेळोवेळी काँग्रेस पक्षाने बौद्ध समाजाला संविधानाचा धोका सांगत आपल्या पारड्यामध्ये कसे बौद्ध समाजाचे मते पाडून घेता येतील तसे तो पाडून घेत गेला...

पण जेव्हा महाराष्ट्रात सन २००६ मध्ये म्हणजेच दि. २९ सप्टेंबर २००६ रोजी जगाला काळीमा फासणारी घटना फुले,शाहू,आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील भंडारा जिल्हा खैरलांजी गावात भैय्यालाल भोतमांगे यांच्या कुटुंबासोबत घडवली असून एका बौद्ध समाजाच्या कुटुंबावर अन्याय अत्याचार करून त्यांचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त करण्यात आले. तेव्हा या महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची पूर्ण बहुमताची सत्ता होती. पण त्याच काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सरकारने ज्या खैरलांजी हत्याकांडाने संपूर्ण भारत देशात नाही तर विदेशात पण या घटनेची निंदा करण्यात आली होती.आणि संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता त्यावेळी इथल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या सरकारने खैरलांजी गावाला तंटामुक्ती पुरस्कार देऊन संबंध आंबेडकरी समाजाचा जाणून–बुजून अपमान करून बौद्ध समाजावर झालेल्या अन्याय अत्याचारावर पडदा टाकण्याचे काम त्यावेळेसच्या राज्य सरकारने केले होते. तेव्हा हे सरकार किती खऱ्या अर्थाने जातावादी मनुवादी विचारांवर चालणार सरकार आहे. हेच त्यावेळी कॉंग्रेस पक्षाने दाखवून दिले आहे.खरंच काँग्रेस पक्षाला जर खैरलांजी हत्याकांड या घटनेची नोंद घेऊन आंबेडकरी समाजाला न्याय मिळवून देण्याचेही काम करता आले असते.पण ते काम त्यावेळी कॉंग्रेस पक्षाने करुन दाखवले नाही. आणि एका विशिष्ट समाजातील लोकांनी एका मुलीवर आणि तिच्या आईवर २२ नालायक औलादीचे गावगुंडांनी जेव्हा बलात्कार करतात तेव्हा या सरकारला कधी जाग आली नाही किंवा बौध्द समाजाबद्दल आत्मियता दाखवता आली नाही... याउलट बौद्ध समाजाला कसे संपायचं हेच काँग्रेस पक्षाने वेळोवेळी प्रयत्न केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला संविधान देऊन या देशातील सामान्य माणसांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला आणि जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना या भारत देशाला बहाल केली. पण त्याच संविधान निर्मात्याला महामानव,बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विरूद्ध काँग्रेस पक्षाने मोठे षडयंत्र रचुन सन १९५२ च्या लोकसभेच्या निवडणुकीत दक्षिण मुंबई येथून पराभव करून त्यांचा अपमान केला. त्यानंतर दुसऱ्यांदा सन १९५४ साली भंडारा लोकसभेच्या पोटनिवडणुकीत मध्ये उभे राहिले असताना त्यांना पुन्हा काँग्रेस पक्षाने जाणून बुजून त्यांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोबत काम करणाऱ्या व्यक्तीला उभे करून त्यांचा पराभव करण्यात आला होता....डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेसला उद्देशून आपल्या समाजाला आव्हान केले होते की, काँग्रेस पक्ष हे जळतं घर आहे आणि त्या पक्षाचे चाराण्याचे पण सभासद होऊ नका अन्यथा तुम्ही जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही असे म्हणाले होते. लागला करायला झुकुनी सलाम पुन्हा.... भीमा तुझं बाळ आता झालं रे गुलाम पुन्हा...महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मार्गावर बहुजननायक मान्यवर कांशीरामजी चालत या देशाची आपण कसे राज्यकर्ती जमात बनायची हे ठरवत देशातील सर्वात मोठ्या प्रदेशात म्हणजे उत्तर प्रदेश सारख्या राज्यामध्ये मान्यवर बहुजननायक कांशीरामजी साहेबांनी चार–चार वेळेस सत्ता काबीज करून दाखवले.आणि बुध्द, फुले,शाहु,आंबेडकर,संत रविदास,पेरियार,नारायण गुरु,बिरसा मुंडा यांच्या विचारांचे राज्य प्रस्थापित करण्याचे काम केले. त्यानंतर इथल्या बहुजन समाजाला जागृत करण्याचे कार्य हाती घेऊन बहुजन समाजाला एक नारा दिला बाबासाहेब के बच्चे के बिना इस देश का शासन चलने नहीं दूंगा...म्हणत बहुजन समाजाला असे सांगितले काँग्रेस हे नागनाथ असुन बीजेपी हे सापनाथ आहे. असे म्हणाले होते. बीजेपी हे उघड–उघड वार करत असते पण काँग्रेस पक्ष हे स्लो पैजन असून तो आपल्याला कधी संपून टाकतो हे आपल्या लक्षात पण येऊ देत नाही. त्यामुळे शक्यतो काँग्रेस पासून चार हात लांब रहा असे सांगत बहुजन समाजाला सावध करण्याचे काम मान्यवर कांशीरामजी साहेबांनी केले होते. जेव्हा आपण आपल्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरून एस.सी.,एस.टी. च्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाच्या विरोधात देशभरात एस.सी.,एस.टी.आणि ओबीसी समाज आंदोलन करतो तेव्हा हेच काँग्रेस पक्ष तेव्हा फक्त बघायची भुमिका घेऊन मुग गिळुन गप्प बसून रहाते... आणि दुसरीकडे मात्र समाजाची दिशाभूल करीत असे सांगत असते..की,संविधान धोक्यात आहे आणि संविधान वाचवण्यासाठी आम्ही प्राण पणाला लावू म्हणत देखावा करत असतो... म्हणुनच आपण काँग्रेस पक्षाची दुप्पटी भुमिका वेळेतच ओळखून काँग्रेस पक्षापासून सावधगिरी बाळगलेली कधीही बरी आहे...नांदेड जिल्ह्यामध्ये एकुण नऊ विधानसभा मतदारसंघ असून त्यामध्ये देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघ हे गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून अनुसूचित जाती (डउ) साठी राखीव ठेवण्यात आले असुन या देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघात आजपर्यंत अनेकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

पण आज पर्यंत कुठल्याही राजकीय पक्षांना असे का वाटले नाही की,देगलूर–बिलोली विधानसभा या मतदारसंघांमध्ये बौध्द समाजाला पण आपल्या पक्षाकडून उमेदवारी देऊन निवडून आणून प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. असे कोणत्याही राजकीय पक्षांना वाटत नसल्यामुळे यावेळी मात्र या मतदारसंघातील बौद्ध समाज राजकीय पक्षांना आपल्या मताची किंमत काय आहे. हे नक्कीच दाखवून दिल्याशिवाय गप्प बसणार नाही. आणि या मतदारसंघातील बौध्द समाज सर्वच राजकीय पक्षावर मोठ्या प्रमाणात नाराज असल्याचे दिसून येत असुन येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये जर बौध्द समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी इथल्या राजकीय पक्षांनी उपलब्ध करून न दिल्यास यावेळी मात्र आपल्या मताची ताकद काय असते हे दाखवल्याशिवाय बौध्द समाज शांत बसणार नाही. याची सर्व राजकीय पक्षांनी नोंद घ्यावी.

## पान एक वरून

**खा.श्रीकांत शिंदे पोटतिडकीने...**खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, महिलेला सक्षम करण्याचा निर्णय आजवर कोणत्याच सरकारने घेतला नाही. महायुतीने महिलांचे हात बळकट करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. लाडकी बहिण योजनेविरोधात काहीजण कोर्टात गेले. ही योजना बंद करु असे बोलतात, मात्र येत्या काळात महिलांना दर महिन्याला पैसे मिळत राहणार कारण महायुतीचेच सरकार पुन्हा सत्तेत येईल, असा विश्वास खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला. जनसंवाद यात्रेचा चौथ्या टप्प्यात आज दुसऱ्या दिवशी खासदार डॉ. शिंदे यांनी बीडमधील शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला संबोधित केले. यावेळी शिवसेना माजी आमदार अर्जून खोतकर, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, प्रवक्ते संजय निरुपम, जिल्हा प्रमुख अनिल जगताप, सचिन मुळक उपस्थित होते.खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, आज प्रत्येक योजना बंद करु असे विरोधक सांगतात मात्र जेव्हा अडीच वर्ष सत्तेत होते तेव्हा तुम्ही घरी बसलात आणि लोकांना घरी बसवले, अशी टीका खासदार डॉ. शिंदे यांनी केली. ते पुढे म्हणाले की, कोरोना काळात मुख्यमंत्री सहायता निधीची लोकांना गरज होती मात्र अडीच वर्षात केवळ २.५ कोटी रुपये खर्च झाले. महायुतीच्या काळात मुख्यमंत्री सहायता निधीमधून दोन वर्षात ३५० कोटी खर्च झाले. हे सरकार घेणारे नाही तर देणारे सरकार आहे, असा पुनरुच्चार खासदार डॉ. शिंदे यांनी यावेळी केला. खासदार डॉ. शिंदे म्हणाले की ७.५ एचपी पंप असणाऱ्या शेतकऱ्यांना शून्य रुपयांचे बील देऊन सरकारने आपला शब्द पूर्ण केला. एक रुपयांत पीक विमा, एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना १२५०० कोटींची मदत केली, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व सर्वसामान्यांतून पुढे आलेले आहे. गरिबी अनुभवल्याने समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा ते प्रयत्न करत आहेत. संपूर्ण महाराष्ट्र हेच कुटुंब या विचाराने मुख्यमंत्री दिवसरात्र काम करतात. ग्रामरोजगार सेवकांचा १७ वर्षांचा संघर्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी क्षणात निर्णय घेऊन मार्गी लावला. पोलीस पाटील, कोतवाल, सरपंच, अंगणवाडी सेविका, मदतनीस या घटकांना न्याय देण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली. मराठवाड्यातील २८ तालुक्यांमध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु केला. सरकारने महात्मा फुले जनआरोग्य योजनेची मर्यादा १.५ लाखांवरुन ५ लाख रुपये इतकी वाढवली. माता सुरक्षित तर घर सुरक्षित योजना राबवली. बीड विधानसभेत १ लाख ३५ हजार लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळतोय, असे खासदार डॉ. शिंदे यांनी सांगितले. सरकारने सारथी, बार्टी सुरु केल्या तशाच प्रकारे बीडमधील वंजारी समाजाबाबत विचार करु, असे ते म्हणाले. बीडची जागा जिंकण्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासून कामाला लागा, असे आवाहन खासदार डॉ. शिंदे यांनी केले. याप्रसंगी शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, बाप्पूसाहेब मोरे यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी– लोकप्रतिनिधी, महिला–भगिनी, शिवसैनिक आणि पत्रकार बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

**बीडमध्ये आंबेडकरी जनतेचा ...**प्रशासनाकडून याबाबतीत कोणतीही बैठक घेण्यात आली नाही. जिल्हाभरातील आंबेडकरी समूह मोर्चा सहभागी होणार आहे. मोर्चाच्या पूर्वसंध्येला पोलीस प्रशासनाकडून आंबेडकरी जनतेला मोर्चा काढण्यास परवानगी नाकारली आहे. त्यामुळे ही बाब लोकशाहीला अनुसरून नाही. पोलीस प्रशासनाने त्या दिवशी मागणी केली त्याच दिवश बैठक बोलविणे क्रम प्राप्त होते परंतु असे झाले नाही. बीड जिल्ह्यामध्ये राज्यपाल असल्याचे कारण सांगून आंबेडकरी जनतेच्या मोर्चाला परवानगी जाणीवपूर्वक नाकारण्यात आली आहे. असा आरोप पत्रकार परिषदेमध्ये आंबेडकरी जनतेने केला. यावेळी ते असंही म्हणाले पोलीस प्रशासनाने बीड रेल्वे स्टेशनला लावलेले. बॅनर नियमांचे उल्लंघन करून काढण्यात आले आहे. सदरील बॅनर व डॉ. आंबेडकर यांचे छायाचित्र असलेला झेंडा काढून अवमान करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पोलीस प्रशासनांमुळे निर्माण झाला आहे. यावेळी प्रशांत वासनिक, रजनीकांत वाघमारे, अनुरथ वीर ,सुजाता वासनिक, ज्योती सरवदे, कावेरी जाधव, नितीन सोनवणे, युवराज जाधव, रवी कांबळे,भाऊसाहेब कांबळे यांच्यासह आंबेडकरी समूह पत्रकार परिषदेला उपस्थित होता.

**मुकबधीर महिलेवर अत्याचार!**...पसार झाला. त्यानंतर पिडीतेच्या चुलतीने दिलेल्या फिर्यादीवरून केज पोलिस ठाण्यात नात्यातील एका नराधमाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरक्षक आनंद शिंदे हे पुढील तपास करत आहेत.

**हरियाणा निकालानंतर पंतप्रधान मोदींची**

अशी आहेत ज्यांनी कधीही काँग्रेसला सलग दोनदा सत्ता दिली नाही. पण भाजपावर तो विश्वास टाकला. हरियाणामध्ये भाजपाला तिसऱ्यांदा सत्ता दिली. हरियाणात जेव्हापासून निवडणूक होऊ लागली तेव्हापासून हे पहिल्यांदाच घडतं आहे. काँग्रेससाठी अनेक राज्यांनी नो एंट्रीचा बोर्ड लावला आहे. त्यांच्या खोट्या आश्वासनांना जनता भुलत नाही. आधी त्यांना वाटायचं की काहीही केलं नाही तरीही आपली सत्ता येईल. पण आता तशी स्थिती नाही. लोकांनी काँग्रेसला नाकारलं आहे.

**काँग्रेसचा डबा गुल झाला आहे** : काँग्रेसचा डबा गुल झाला आहे, तसंच त्यांचं पितळ उघडं पडलं आहे. काँग्रेस सत्तेला आपला जन्मसिद्ध अधिकार मानते. सत्ता नसेल तर काँग्रेसची अवस्था ही जल बिन मछली सारखी म्हणजेच पाण्याशिवाय तडफडणाऱ्या माशासारखी होते. त्यामुळे ते सत्तेत आल्यानंतर देशाला, समाजाला पणाला लावतात. त्याचं त्यांना काहीही वाटत नाही. आज संपूर्ण देश पाहतो आहे की काँग्रेस आपल्या समाजात जातीभेदाचं विष कालवते आहे. जे लोक सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मले, फाईव्ह स्टार आयुष्य पिढ्या न पिढ्या जगत आहेत ते आता गरीबांना जातीच्या नावावर लढवू पाहात आहेत. आपल्या दलित, आदिवासी आणि मागासवर्गाने हे मुळीच विसरु नये.

**ममता मत्स्य संस्थेच्या विरोधात**...मध्ये ८ लाख ६९ हजार २०० रूपये उचलून घोटाळा केला असल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे ती रक्कम एनपिसीआय डिबीटी मार्फत सर्व सभासदांच्या खात्यावर समप्रमाणात अनुदान जमा करण्यात यावेत. खोटे राजीनामे, सभासदांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करून त्यांना संस्थेतून कमी करणे, संस्थेच्या खात्यावरून पैसे उचलून गैरव्यवहार केल्याप्रकरणी दोषींवर कलम ४२० प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करू कार्यवाही करण्यात यावी, संचालक मंडळावर कायम स्वरुपी बंदी आणावी अशी मागणी उपोषण करते गणपती खिरे यांनी केली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाला सांगण्यात आले आहे की उपोषणकर्त्याशी चर्चा करून त्यांचे उपोषण सोडवण्यात यावे उपोषणकर्त्याच्या मागणीप्रमाणे दोषी आढळल्यास संस्थेवर कारदेशीर कारवाई करण्यात येईल अशी प्रतिक्रिया एस.एम केदार सय्यद निबंधक सहकारी संस्था दुध बीड यांनी दिली.

**गेवराई नेत्यांकडून दसरा...**असे असले तरी मनोज जरांगे पाटील यांच्या सभेला मराठा समाज बांधव एकजुटीने त्यांच्यासोबत खंबीरपणाने उभा आहे. प्रत्येक जण आपापल्या कृवतीप्रमाणे आर्थिक मदत करतो आहे. मराठा समाजाची ही गोष्ट इतर समाजाने घ्यावी असा आदर्श मराठा समाज बांधवांनी निर्माण केला आहे. एकजूट काय असते त्यामुळे काय बदल होतो. याचे जर निरीक्षण केले तर मराठा समाजाचे निघालेले मोर्चे आणि झालेल्या सभा एक जिवंत आणि मूर्तीमंत उदाहरण असेल. त्याच भूमिकेतून गेवराई मतदार संघाचे माजी आ.अमरसिंह पंडित यांनी नारायण गडावर होत असलेल्या दसरा मेळाव्यासाठी साखरेच्या पोत्याचा एक ट्रक देऊन सामाजिक दायित्व निभावले आहे. समाजाप्रती अमरसिंह पंडित यांची भूमिका नेहमीच सकारात्मक आणि सहकार्याची राहिलेली आहे. विशेष बाब म्हणजे मदत करत असताना कोणताही गवगवा न करता ही मदत दिली आहे. त्यामुळे त्यांचे नेतृत्व ग्रेट आहे, अशा लोकभावना गेवराई मतदार संघातून उमटू लागलेल्या आहेत.

## पान सहा वरून

**दिव्यांगांसाठी सर्वात जास्त...** देणारा मतदार संघ असेल असे धनंजय मुंडे म्हणाले. डॉ.संतोष व त्यांची टीम दिव्यांगांना विविध सहाय्यक उपकरणे मोफत उपलब्ध करून देण्यासाठी सतत शिबिरे घेत असतात. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे असेही ते पुढे बोलताना म्हणाले.तदनंतर या शिबिराचे संयोजक दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी प्रास्ताविकात बोलताना दिव्यांगांच्या हृदयाच्या वेदना जाणून घेणार नेता म्हणजे ना.धांजय मुंडे आहेत असे उद्गार काढले. आणि या मोफत वाटप केलेल्या १००० श्रवण यंत्राच्या माध्यमातून १००० गरजू दिव्यांगाच्या जीवनात एक अमुलाग्र बदल होईल असेही ते म्हणाले. अशा भव्य मोफत दोन दिवसीय शिबिरामध्ये परळी मतदार संघातील तब्बल १००० कर्णबद्धिर नागरिकांना मशिनद्वारे तपासणी करून श्रवण यंत्रांचे वाटप करण्यात आले .तसेच ३७०० पेक्षा जास्त नागरिकांची नवीन नाव नोंदणी करण्यात आली.

**नाट्यगृह नामकरणाचा मांडला**... पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह असे नामकरण करण्यासाठी ठराव मंजुर करण्यात आला त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह नामकरण झाले आहे त्यामुळे नागरिकांत आनंद व्यक्त होत आहे यापूर्वी गेवराई शहरातील बाजारात तळावरील तापडीया सिटी सेंटरचे महात्माफुले शॉपींग सेंटर असे नामकरण करण्यात आले तसेच छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे अनेक नामकरण आ.लक्ष्मण पवार यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.

**दांडी बहाद्दरांवर कारवाई**....करून सदर कार्यालयात होतकरू तरुणांची निवड करावी व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती कार्य करावी असे निवेदनात म्हंटले आहे निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी अहमदनगर तहसीलदार राहुरी गट विकास अधिकारी राहुरी माहिती अधिकार साहेब राहुरी यांना पत माहिती साठी पाठवल्या आहेत.

**...खांद्यावर सोपविली सदस्यत्वाची**...बियाणे समितीला नियतकालिक अहवाल पाठवणे, राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळेची तपासणी करणे आणि बियाणे कायद्यांतर्गत राज्य बियाणे चाचणी प्रयोगशाळा म्हणून घोषित करण्यासाठी तिच्या योग्यतेचा अहवाल राज्य सरकारला देणे, बियाणे कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन देणे, राज्यासाठी पिकांच्या नवीन जाती घेण्याचा विचार करणे, राज्यात नव्याने प्रसिद्ध झालेल्या वाणांच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे ही या समितीचे प्रमुख कार्य आहेत. या उपसमितीचे मुख्यालय मुंबई येथे असणार आहे.नवनियुक्त तीनही पदाधिकाऱ्यांचे कृषिमंत्री धनंजय मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांसह माजी आ.संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, अंबाजोगाईचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

**बीडचा प्राचीन इतिहास**....जवाहरलाल सारडा होते. ट्रस्टचे अध्यक्ष रमाकांत पतंगे, सचिव माने, ज्येष्ठ संचालक मारुतीराव नाईकवाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी खंडोबा ट्रस्टच्या वतीने डॉ. कुलकर्णी डॉ. साळुंके व जिल्ह्यातील पहिले इंडोलॉजिस्ट अण्णासाहेब गडदे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तावित डॉ. सतीश साळुंके यांनी केले. प्रस्ताविकात ते म्हणाले की, बीड परिसरातील इतिहास शालेय मुलांपर्यंत पोहोचवण्याचा साठी इतिहास परिषद विविध उपक्रम आयोजित करीत आहे. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना जवाहरलाल सारडा म्हणाले, मोबाईल वरील एका क्लीक वर खंडोबा मंदिर व दीपमाळीची माहिती हजारो लोकांना कळणार ही बाब मंदिराच्या स्थापत्य आणि शिल्पकलेच्या प्रचारासाठी मोठी गती देणारी आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी केंद्रेकारांचा आवर्जून उल्लेख करून त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सारडा यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी इतिहास परिषदेत परिषदेचे दीपक सरवदे, प्रशांत मुळे, अण्णासाहेब गडदे, श्री गडदे उपस्थित होते. क्यु आर कोड तयार करण्यासाठी श्री गडदे व मंगेश रोटे यांनी विशेष श्रम घेतले शेवटी दीपक सरवदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**बौद्ध धम्म परीषदेस**...न्याय भवन येथून बुद्धमुर्तीसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, भिक्खुसंघ, उपासक, उपासिका यांच्यासह धम्म मिरवणुकीस प्रारंभ होईल. मिरवणुकीचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन– शिवाजी महाराज पुतळा कारंजा बलभिम चौक टिळक रोड सुभाष रोड डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक असून येथे अभिवादन व धम्मध्वजारोहन करून नाळवंडी नाका– ते शिवणी येथे मिरवणुकीचा समारोप होणार आहे. १२ ऑक्टोबर रोजी मौजे शिवणी येथे सकाळी १०.०० वा. ऐतिहासिक बोधीवृक्षाची पुजा त्यानंतर पु.भिक्खु पञ्ञाबोधी थेरो (अध्यक्ष नांदेड, जिल्हा भिक्खु संघ) यांच्या हस्ते मुख्य धम्मध्वजारोहन होणार आहे. सकाळी १० ते १२.०० यावेळेत भिम व बुद्ध गितांचा सांस्कृतीक कार्यक्रम व मुख्य कार्यक्रमाचे उदघाटन दुपारी १२ वाजता होणार आहे.अशी माहिती मुख्य संयोजक तथा सचिव प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था,बीड पु. भिक्खु धम्मशील थेरो हिंगोली/बीड स्वागताध्यक्ष डॉ. सुनील सरवदे (चेअरमन माऊली मल्टीस्टेट, नाशिक) यांनी दिली आहे. या धम्म परिषदेस बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीड व समस्त बौद्ध उपासक, उपासिका यांच्या वतीने करण्यात आले आहे.


संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# प्रिय नदीस ठरला सर्वोत्कृष्ट चित्रपट

## सांस्कृतिक आलिबाग चित्रपट महोस्तवात

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

भास्कर किसन शिंदे यांच्या 'भास्करनाना फिल्म प्रोडक्शन' या निर्मिती संस्थेची पहिलीच निर्मिती असलेला प्रिय नदीस या लघुपटाने नुकत्याच पार पडलेल्या पाचव्या अलिबाग फिल्म फेस्टीवल-२०२४ मध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा बहुमान पटकावला आहे.

लेखक आर प्रकाश (प्रकाश राठोड) यांनी या चित्रपटाचे लेखन केले असुन विष्णूदादा उगले यांनी हा चित्रपट दिग्दर्शीत केला आहे. तर अमर देवणे यांनी चित्रपटाचे दर्जेदार छायाचित्रन व कलात्मक संकलन केले आहे. चि.प्रसनजित शिंदे, बद्रीनाथ खंडागळे, ड.पूजा देडे व भिमराव घोडेराव या कलाकारांनी भूमिका केल्या आहेत. तसेच सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी कला दिग्दर्शनाची बाजु सांभाळली तर ध्वनि मुद्रनाचे काम सुभाष कांबळे यांनी तर संतोषमामा चौरे, पृथ्वीराज शिंदे व टिल्लू दळवी यांनी निर्मिती प्रक्रियेत यांचे महत्त्वाचे योगदान दिले.



प्रिय नदीस च्या या यशाबद्दल प्रिय नदीसच्या सर्व टिमचे मान्यवर व रसिक प्रेक्षक कलाप्रेमीच्या वतीने सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

'प्रिय नदीस' हा लघुपट म्हणजे सतत दुष्काळाने होरपळलेल्या मराठवाड्याच्या वेदनेवर मायेने मारलेली फुंकर होय.
-विष्णू उगले (दिग्दर्शक)

या लघुपटाच्या निमित्ताने मी पहिल्यांदाच निर्माता म्हणून उभा राहीलो आहे. हा पुरस्कार मला नक्कीच पुढच्या चित्रपट निर्मितीसाठी बळ देयील.
-भास्करनाना शिंदे, (निर्माता)

# तुरळक ठिकाणी पावसाची रिमझिम!

## अस्मानी:कापूस वेचणी मजुरांची उडाली तारांबळ



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामीण भागात मंगळवारी दुपारी तीन वाजता अचानक रिमझिम पावसाने हजेरी लावली आहे त्यामुळे शेतातील कापूस वेचणी मजुरांची तारांबळ उडाली होती तर वेचणी केलेला कापूस व कापणी केलेला मका झाकण्यासाठी धावपळ दिसून आलो दरम्यान ग्रामीण भागात दहा मिनिटे तुरळक पावसाने हजेरी लावली आहे

सोयगाव तालुक्यात मंगळवारी पहाटे पासून अचानक ढगाळ व बदलत्या वातावरणामुळे गारठा होता अजिंठ्या च्या डोंगर रांगात दिवस भर धुके पसरले होते ढगाळ वातावरण मुळे दुपारी अचानक तीन वाजता तुरळक ठिकाणी रिमझिम पाऊस झाला होता त्यामुळे शेतकऱ्यांची धावपळ उडाली होती सध्या कापूस वेचणी सुरु आहे शेतकऱ्यांनी वेचणी केलेला कापूस भिजण्याचा भीतीने शेतकऱ्यांनी कापूस झाकुन ठेवण्यासाठी लगबग सुरू होती अचानक झालेल्या पावसाने तारांबळ उडाली होती.

# सुमधुर गाण्यांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध



पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

स्वराष्टक ग्रुप तर्फे जुन्या ऐंशी व नव्वदीच्या दशकातील गाण्यांचा कार्यक्रम पुण्यातील यंशवंतराव चव्हाण नाटयगृह येथे पार पडला. यामध्ये डॉ सुजित जोशी यांनी सुमधुर गायिलेल्या गाण्यांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाल्याचे पहावयास मिळाले. एकशे एक गाणी व तितक्याच धडाक्यात सर्व कलाकारांनी गायिलेल्या गाण्यांनी प्रेक्षकांनी नाट्यगृह अगदी डोक्यावर घेतले होते. वांरवार लोकांचे वन्समोयर मिळत होते.

यावेळी माध्यमांशी सवांद साधताना डॉ जोशी आम्ही वेगवेगळ्या क्षेत्रातील असून आपले व्यवसाय सांभाळून हि कलेची जोड जोपासत आहोत. आम्ही आठ जण आहोत.

आतापर्यंत दहा शो केले आहेत. लाईव्ह म्युझिक तसेच इतर कलाकारांना आम्ही संधी देत आहोत . सर्वांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी डॉ. सुजित जोशी, रेवती सुपेकर, अस्मिता साने, भूषण जोशी, अद्वैत पाटणकर, गायत्री दीक्षित, रोहित काळे, अश्विनी मोडक यांनी देखील अप्रतिम गायन या प्रसंगी केले

# शासकीय संस्थांची नावे बदलली

## नामांतरण:मंत्री धनंजय मुंडेंचा पाठपुरावा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व उद्योजकता विभागाने घोषित केलेल्या निर्णयाप्रमाणे बीड जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना मान्यवरांची नावे देण्यात येत असून, बीड जिल्ह्यातील परळी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे तर अंबाजोगाई शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस स्व.प्रमोद महाजन यांचे तसेच बीड शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस स्व.विनायकराव मेटे यांचे आणि महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस राणी पद्मिनी यांचे नाव देण्याचा निर्णय विभागाने जाहीर केला आहे.



या नावांबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रशासनाला सूचना केल्या होत्या. त्यानुसार ही नावे देण्यात आली आहेत. राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अशाप्रकारे मान्यवरांची व समाजभूषण व्यक्तींची नावे देण्याचा निर्णय कौशल्य व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. त्यानंतर बीड जिल्ह्यातील प्रमुख ४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे वरीलप्रमाणे नामकरण केल्याबद्दल श्री लोढा यांचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आभार मानले आहेत.

# आरोग्यात काकू-नाना प्रतिष्ठानचे योगदान

## डॉ.शहाबाज खान : सोनाजीराव महाविद्यालयात आरोग्य शिबीर



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे संकल्पनेतून काकू नाना प्रतिष्ठान,आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षिरसागर वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत मा.उपमुख्यमंत्री (गृह /विधी व न्याय)मंत्रालय मुंबई. यांच्या समन्वयाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर बीड तालुक्यातील बेलखंडी पाटोदा येथे दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ ला आयोजित केले होते.याप्रसंगी बोलताना डॉ. खान म्हणाले की, लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून तसेच काकू नाना प्रतिष्ठानचे डॉ.अरुण भस्मे, प्राचार्य महेंद्र गौशाल, समन्वयक अंजली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली २०ऑगस्ट पासून बीड तालुक्यातील विविध गावांत जाऊन विविध प्रकारच्या आजारांनी त्रस्त रुग्णांवर मोफत तपासणी करून औषधोपचारासह आवश्यकतेनुसार ईसीजी,रक्त तपासणी केली जाते. अशा समाजोपयोगी शिबिरांमधून लोकांच्या निरोगी आरोग्यात काकू - नाना प्रतिष्ठानचे मोठे योगदान असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.या शिबिरात सी एच ओ डॉ.प्राची इनकर,डॉ. कोमल शिनगारे, प्रशिक्षणार्थी डॉ. तन्मयी लोंढे,आरती डोरले यांनी रुग्णांची तपासणी केली.

# बंजारा समाजाच्या महिलेवर अत्याचार

## बी.एम.पवार: नराधमाला तात्काळ अटक करा

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील निमगाव मायंबा लिमगाव येथील लमाण वाडी तांड्यातील बंजारा समाजाच्या भगीनीवर एका नराधमाने वीस दिवसांपूर्वी बलात्कार केला परंतुअद्यापही त्या नराधमाला पोलिसांनी अटक केली नाही त्यामुळे त्याला तात्काळ अटक करा अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ओबीसी समाजाचे नेते तथा सेवालाल सेना संस्थापक अध्यक्ष बी एम पवार यांनी दिला आहे.

या संदर्भात अधिक माहिती देताना बी एम पवार म्हणाले की, बीड जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील निमगाव मायंबा लिमगाव येथील लमाण वाडी तांड्यातील एका बंजारा समाजाच्या भगीनीवर भरत नवनाथ टिळक या नराधमाने घरात घुसून व चाकुचा धाक दाखवून तिच्यावर बलात्कार केला. सदरील घटना घडल्यानंतर पिडीत महिलेनी चकलांबा पोलिस ठाण्यात १९/९/२०२४ रोजी सदरील नराधमाच्या विरोधात तक्रार दिली. पिडीत महिलेची तक्रार दाखल करुन घेण्यासाठी पोलिसांनी टाळाटाळ केली परंतु पिडीत महिलेनी सांगितले की,माझी तक्रार घेतली नाही तर मी माझे आयुष्य संपवून टाकेल त्यानंतर सदरील आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला गेला. सदरील घटना घडल्यानंतर सुद्धा सदरील आरोपी हा तांड्यातील लोकांना धमक्या देत असुन तांड्यातील समाज बांधवांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. बंजारा समाजाच्या भगीनीवर बलात्कार करणाऱ्या त्या नराधमाला आठ दिवसाच्या आत अटक केली नाही तर बीड जिल्ह्यासह राज्याभर बंजारा समाज बांधव रस्त्यावर येऊन आंदोलन करेल असा इशारा बी एम पवार यांनी दिला आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील भगदाड बुजविले!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड तालुक्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ धुळे ते सोलापूर या महामार्गावरील मांजरसुभा येथील बीडकडे जाणारा उड्डाणपूल संपतो त्याठिकाणी ३ मोठमोठाले भगदाड पडलेले होते.त्यामुळे रात्री अपरात्री अपघाताची दाट शक्यता ओळखून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी लेखी तक्रार ईमेल द्वारे रविवार रोजी नितिनजी गडकरी गडकरी , प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना केली होती. यासंदर्भात विविध सायं दैनिके तसेच आज सोमवार रोजी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.तक्रारीची आणि प्रसारमाध्यमांची दखल घेऊन आजच आयआरबी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांमार्फत तिन्ही भगदाड बुजविण्यात आले.त्यामुळे भविष्यात संभाव्य अपघात टळण्यास मदत झाली आहे.



# आंतरभारतीचा आदर्श कार्यकर्ता पुरस्कार

## कौतुकास्पद :शरद लंगेंचा ऑक्टोबरला होणार सन्मान

आंबेजोगाई/ पुण्यभूमी प्रतिनिधी

आंतरभारतीचे आजीव सदस्य शरद लंगे यांना २०२४चा आदर्श कार्यकर्ता पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.या पुरस्काराचे वितरण १५ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधींच्या जीवन व कार्याचे अभ्यासक चंद्रकांत झटाले (अकोला) यांच्या हस्ते १५ ऑक्टोबर रोजी दिला जाणार आहे.



शरद लंगे हे आंतरभारतीचे आजीवन सभासद असून ते आंबाजोगाई येथे कार्य करतात. आंबाजोगाई शहर शाखेचे ते सक्रिय कार्यकारिणी सदस्य आहेत. मूलतः गिरवलीचे राहणारे शरद लंगे हे येथील मेडिकल परिसरातील डॉ. डावळे विद्यालयात शिक्षक आहेत. म. गांधी वरील 'प्रश्न मंजुषा' घेताना त्यांनी केलेली धडपड तथा स्नेहसंवर्धन पुरस्कार वितरण सोहळ्याचे यशस्वी संयोजन केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे असे आंतरभारतीच्या वतीने अमर हबीब (मार्गदर्शक), शैलजा बरूरे (अध्यक्ष), संतोष मोहिते (सचिव) यांनी सांगितले. आधार मल्टीस्टेटच्या अजिंठा सभागृहात १५ ऑक्टोबर रोजी सायं ५.३० वाजता पुरस्कार वितरणाचा सोहळा होईल. या प्रसंगी चंद्रकांत झटाले (अकोला) यांचे 'म. गांधी- वास्तव आणि विपर्यास्त' या विषयावर व्याख्यान होईल.

## योजना लाडकी बहीण, पीएम किसान, नमो किसानचे पैसे मिळण्यास सुरुवात

# ग्रामीण भागात डाकघर कार्यालयात गर्दी!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेचे ३ हजार व पंतप्रधान किसान व राज्याच्या नमो योजनेचे ४ हजार रुपये तालुक्यातील लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होत आहे. सणासुदीच्या काळात पैसे मिळत असल्याने महिला व शेतकरी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे परंतु ऐन सणासुदीला बँकांमध्ये रोकडची टंचाई भासत आहे त्यामुळे लाभार्थ्यांची गैरसोय होत आहे. लाडकी बहीण योजनेतील पहिल्या टप्प्यात म्हणजेच जुलै व ऑगस्ट महिन्यात अर्ज भरलेल्या महिलांच्या बँक खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले होते. तर सप्टेंबर महिन्यात अर्ज भरलेल्या महिलांच्या बँक खात्यावर ४ हजार ५०० रुपये जमा झाले होते. त्यानंतर आता सप्टेंबर महिन्यात एकाच वेळी ३ हजार रुपये महिलांच्या बँक खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. दुसऱ्या बाजूला खरिप हंगाम २०२३ मध्ये कापूस व सोयाबीन पिकांची झालेल्या नुकसान भरपाई पोटी कृषी विभागाच्या वतीने हेक्टरी पाच हजार रु अनुदान मिळत आहे तसेच किसान सन्मान योजना व राज्याच्या नमो किसान योजना असे दोन्ही योजनेचे एकूण ४ हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा होण्यास शनिवार सकाळपासून सुरुवात झाली आहे. सणासुदीच्या काळात अर्थसाहाय्य झाले असल्याने आनंदाचे वातावरण पाहावयास मिळत आहे. शासनाकडून शासकीय योजनांचा लाभ देण्यास सुरुवात झाली आहे. ज्या काही शासकीय योजना होत्या, लोकहितासाठी चालविल्या जात होत्या. त्या योजनांसाठी सरळपणे निधी वितरित केला जात असल्याची माहिती महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.



### पोस्ट व बँका गर्दीने फुल

लाडकी बहीण योजनेची व इतर लाभाची रक्कम काढण्यासाठी लाभार्थ्यांची मोठी गर्दी बँकेत व पोस्ट विभागात दिसून येत आहे दरम्यान कधी काळी गावाच्या डाकघर विभागात कोणीही फिरकत नसतांना आता मात्र लाडकी बहीण योजनेमुळे ग्रामीण डाकघर विभागाला सोनेरी दिवस आले असून लाडकी बहीण योजनेमुळे गाव स्तरावरील पोस्ट विभागात लाखो रु ची उलाढाल होतांना दिसून येत आहे.

# पैठण तालुक्यात निराधरांना मिळाला दिलासा

## योजना : २ हजार २६२ अर्ज झाले मंजूर

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचे तब्बल २ हजार २६२ अर्ज मंजूर झाले असल्याची माहिती तहसीलदार सारंग चव्हाण यांनी दिली. या लाभार्थ्यांना विलास बापू भुमरे प्रतिष्ठानच्या वतीने मोफत अर्ज उपलब्ध करून देण्यात आले होते.आता श्रावणबाळचे १२८६ अर्ज तर संजय गांधी निराधार योजनेचे ३७७ अर्ज मंजूर झाले असे विलास बापू प्रतिष्ठानचे शेखर शिंदे यांनी सांगितले.



पैठण तालुक्यात गाव पातळीवर श्रावण बाळ व संजय गांधी योजनेचे अर्ज विलास बापू प्रतिष्ठानच्या वतीने काही महिन्यांपूर्वी वाटप करण्यात आले होते.शासनातर्फे निराधार, विधवा, ज्येष्ठ नागरिक, दिव्यंगासाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या जातात.या योजनांद्वारे संबंधितांना दरमहा अनुदान मिळते.त्यानुसार ६० ते ६५वर्ष वयोगटातील निराधार जेष्टांसाठी श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजना राबवली जाते.या योजनेअंतर्गत दरमहा दीड हजार रुपये दिले जातात.

सोमवारी २हजार २६३ नागरिक, महिलांना व ज्येष्ठांना या योजनेचे अर्ज मंजूर करण्यात आले असून लवकरच या लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील असे विलास बापू प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी सभापती विलास भुमरे यांनी सांगितले.या योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या पैशामुळे तालुक्यातील अनेक गरजूंना मोठा आधार मिळत आहे.

**सुविचार :** .सत्य कोणत्याही कसोटीला घाबरत नाही.

# स्वप्न आणि वास्तव........!

भारत लवकरच जगाची तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणार, भारत लवकरच म्हणजे फार तर फार वीस वर्षात विकसित देशाच्या पंक्तीत जाऊन बसणार, अशी स्वप्ने भारताचे विद्यमान पंतप्रधान भारतीय जनतेला कायमच दाखवत आहेत. अर्थात स्वप्न पाहणे हा काही गुन्हा नाही, खरे तर मोठे ध्येय समोर असले की वाटचाल देखील तितकीच जोमाने आणि योग्य दिशेने होते. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न पाहणे गैर नाही, परंतु स्वप्न पाहणे आणि स्वप्नातच जगणे यात मूलभूत फरक आहे. भविष्यातील स्वप्नाला वर्तमानातील काहीतरी आधार लागतो. या पृष्ठभूमीवर येत्या दोन दशकात विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत स्थान मिळवण्याचे स्वप्न पाहणारा भारत सध्या कुठे आहे हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. विकसित भारतातील स्वप्न केवळ जीडीपीच्या वाढीतून साध्य होणार नाही. सर्वसामान्य माणसापर्यंत विकासाचे फायदे पोहोचले पाहिजे आणि ते पोहोचल्याचे दिसले पाहिजे. त्यासाठी रोजगाराच्या संधी मुबलक प्रमाणात उपलब्ध होणे ही पूर्वअट आहे.

सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातले प्रश्न खूप छोटे, अगदी प्राथमिक स्तरावरचे आणि म्हटले तर अतिशय सोपे असतात. नळाला रोज पाणी येते का, बसेस- ट्रेन वेळेवर धावतात का, उन्हाळयात पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असेल ना, आपण बनवलेल्या छोट्या मोठ्या वस्तूंना बाजारात ग्राहक मिळतील ना, अशा छोट्या मोठ्या प्रश्नातूनच सामान्य माणसाच्या अपेक्षा व्यक्त होत असतात. ज्या देशात हे सामान्य प्रश्न देखील अतिशय किचकट आणि उत्तरे त्याहून किचकट ठरत असतील त्या देशाने अल्पावधीत विकसित राष्ट्राचे स्वप्न पहावे का, हा एक मूलभूत प्रश्न आहे. देशातील विद्यमान परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर सामान्य लोकांकडून परिस्थितीचे योग्य आकलन होत नसल्याचे दिसते. त्यामुळे सरकारकडे नेमकी कशाची मागणी करावी, कोणत्या मुद्द्यांवर निवडणुकीमध्ये सरकारला किंवा निवडणुकीत सहभागी राजकीय पक्षांना जाब विचारावा यात फारसा ताळमेळ असल्याचे दिसत नाही. निवडणुकांचा हंगाम जवळ आला की सामाजिक गरजांच्या वास्तववादी प्रश्नांपेक्षा भावनिक मुद्द्यांना आणि सत्ताधारी पक्षांकडून निवडणूक डोळयासमोर ठेवून घोषित केलेल्या तत्कालिक प्रलोभन देणाऱ्या योजनांना अधिक महत्त्व मिळत असल्याचे दिसते. दर्जेदार सार्वजनिक सेवा मिळण्यासाठी आग्रही राहण्याऐवजी शासनाकडून मिळणाऱ्या ठलाडक्या' सवलती घेण्यात सामान्य लोक धन्यता मानतात. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे की देश समृद्ध व्हायचा असेल तर गाव, खेडी समृद्ध व्हायला हवीत, परंतु आज अतिशय विपरीत चित्र समोर येत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणारा शेतकरी आज गरिबीत पिचत असल्याचे दिसते तर दुसरीकडे देशाची संपत्ती ही शंभरेक बडया व्यापारी-उद्योजक घराण्यांच्या हातात एकवटली असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाच्या असलेल्या छोटया उद्योजकांचे त्यांच्या प्रादेशिक बाजारपेठेतही स्थान कमी होऊन, बडया कंपन्यांचा बेलगाम विस्तार, हे आजचे विदारक वास्तव आहे. देशातल्या फक्त २० टक्के लोकांकडे ८० टक्के संपत्ती एकवटली आहे. उरलेली ८० टक्के लोकसंख्या ही असंघटित क्षेत्रात काम करीत आहे आणि त्यातले बहुतांश लोक तुटपुंज्या पगारावर या २० टक्के बडया लोकांची सेवा करीत आहेत. कोणत्याही मोठ्या शहरातल्या बाजारात अर्थव्यवस्थेच्या केंद्रीकरणाचे हे दृश्य अगदी सहज डोळयासमोर दिसते. मोजक्या कंपन्यांची मक्तेदारी व जाहिरातबाजी यांमुळे सामान्य ग्राहक ब्रँडेड पण महागडी उत्पादने विकत घेत आहे. छोटा कारखानदार जीएसटी व 'एक- राष्ट्र- एक- जटिल-नियमावली'च्या जाचात सापडलेला दिसतो. याचा परिणाम स्थानिक रोजगार व संपत्ती वितरणावर होतो. अनेक राज्यांत परप्रांतीय वर्ग वाढत आहे. प्रादेशिक समाजव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहेत. प्रदूषण आणि संसाधनांवर ताण वाढत आहे. भारत उघडपणे भांडवलशाही देश नसला तरी केंद्र सरकारची धोरणे काही मोजक्या उद्योजक घराण्यांना झुकते माप देणारी आणि त्यातून स्पर्धात्मकता नष्ट किंवा कमी करणारी आहेत. परंतु केंद्राच्या मर्जीतल्या भांडवलशाहीने ना रोजगार निर्माण केले, ना सामान्य माणसाला प्रतिष्ठा दिली, ना कार्यक्षमता वाढवली आणि ना तिने जागतिक पातळीवर स्पर्धा करण्याची कुवत निर्माण केली! उलट, त्याने प्रादेशिक असमतोलच वाढत आहेत. ' सबका साथ, सबका विकास ' ही उक्ती जोपर्यंत कृतीतून समोर येत नाही, तोपर्यंत विकसित भारताचे स्वप्न पाहण्याचा अधिकार या सध्याच्या भारताला नाही.

# भाकरी फिरवली, परंतु.........?

हरियाणाचे वातावरण आपल्यासाठी फारसे अनुकूल नाही, याची जाणीव भाजप नेतृत्वाला लोकसभा निवडणुकीच्या आधीपासूनच झाली होती. शेतकऱ्यांचे आंदोलन, कुस्तीपटूंचे आंदोलन आणि त्यातून बिघडलेले जातीय समीकरण हे सगळे पाहून भाजप नेतृत्वाने लोकसभा निवडणुकीपूर्वीच हरियाणात भाकरी फिरवली. मोदींचे अगदी घनिष्ट मित्र असलेल्या मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्री पदावरून बाजूला करीत नायब सैनी यांच्याकडे मुख्यमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली. त्यातून जातीय समीकरण जुळवण्याचा प्रयत्न भाजपने केला, परंतु लोकसभा निवडणुकीत त्याचा फारसा फायदा भाजपला झालेला दिसला नाही. मागच्या वेळी हरियाणातील सगळया दहा जागा जिंकणाऱ्या भाजपला यावेळी केवळ पाच जागांवर समाधान मानावे लागले. किमान विधानसभा निवडणुकीपर्यंत तरी परिस्थिती बदलेल ही आशा भाजप नेतृत्वाला होती, परंतु हरियाणाचा कल बघता यावेळी तिथे भाजपला सत्ता गमवावी लागण्याची दाट शक्यता आहे. मुख्यमंत्री पदावरून हटविल्यामुळे नाराज असलेले खट्टर यावेळी मनापासून विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये उतरलेले दिसले नाही. त्यांनी थोडाफार प्रचार केला, परंतु अमित शहांनी भाजपची सत्ता आल्यास मुख्यमंत्री नायब सैनीच असतील असे घोषित केल्यामुळे खट्टर खट्टू झाले. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत सगळी मदार सैनींवर होती. त्यांनी ओबीसी मतदार टिकवले तर भाजप स्पर्धेत राहील. पण, भाजप नेत्यांची देहबोली बघता भाजपने आपला पराभव मान्य केल्याचे दिसते. अगदी मोदी आणि शहा देखील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी हरियाणामध्ये नव्हते. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मोदी झारखंडमध्ये तर शहा महाराष्ट्रात होते. अखेरच्या टप्प्यामध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना प्रचारात उतरवण्यात आले, योगींनी डझनभर सभा घेतल्या पण, त्यांच्या भाषणांची फारशी चर्चा झाली नाही. जातींच्या समीकरणांमध्ये हरियाणाची निवडणूक इतकी फसली आहे की मोदी, शहांसोबत तिथे योगीदेखील निष्प्रभ झाल्याचे दिसते. एकूणच भाकरी फिरवून देखील भाजपच्या ताटात काहीच पडत नसल्याचे चित्र समोर येत आहे.

## स्टेट लाइन

# अमितभाईंचा ऊर्जामंत्र...




**डॉ. सुकृत खांडेकर**

9594224000


सव्वादोन वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचे सरकार खाली खेचण्यात भाजपाने यश मिळवले, आघाडीतील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली आणि ते पक्ष दुर्बल झाले. तरीही लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने बाजी मारली ही भाजपाला डोकेदुखी ठरली. राज्यात भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) अशा तीन पक्षांचे मिळून महायुतीला २०० आमदारांचे समर्थन असले तरीही वेगवेगळ्या सर्वेक्षणात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे आमदार जास्त निवडून येतील, असे अंदाज प्रकटले आहेत. महायुतीचे १२३ व महाआघाडीचे १५२ आमदार विजयी होतील, असे सर्व्हे सांगत आहेत. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत महायुतीचे काय होणार? हा प्रश्न मौल्यवान बनला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे महाराष्ट्रातील परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. अमित शहा यांनी मुंबईत दादर आणि वाशी येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मार्गदर्शन केले. यावेळी राज्यात महायुतीचे सरकार येईल; पण सन २०२९ मध्ये भाजपा स्वबळावर सत्तेवर येईल, असे भाकीत त्यांनी केले. अमित शहा देशाचे गृहमंत्री आहेत. राज्यातील राजकीय परिस्थिती व लोकांची मानसिकता कशी आहे, याचे गुप्तचर यंत्रणांचे अहवाल थेट त्यांना मिळत असतात. शिवाय पक्षाची स्वतंत्र यंत्रणा आहेच. निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिस्तबद्ध केडर भाजपाच्या प्रचारासाठी नेहमीच सज्ज असते. राज्यात विधानसभा निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात अपेक्षित आहे. म्हणूनच भाजपाचे चाणक्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमितभाईंचे मार्गदर्शन पक्षासाठी मौल्यवान होते. महाराष्ट्र हे भाजपाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. देशाची आर्थिक राजधानी या राज्यात असून पुरोगामी व प्रगतिशील महाराष्ट्राची सत्ता भाजपाच्या हाती राहिली पाहिजे, यावर नरेंद्र मोदी, अमित शहा व जे. पी. नड्डा यांचा कटाक्ष आहे. म्हणूनच लोकसभा निवडणुकीनंतर अपयशाने निराश झालेल्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना ऊर्जा देण्यासाठी अमितभाईंनी महाराष्ट्रात व मुंबईत कार्यकर्त्यांचे मेळावे घेतले. काहीही करा पण सत्ता परत आणा, असे अमितभाईंनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपा निवडणूक लढवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय जनता पक्षाची स्थापना दि. ६ एप्रिल १९८० रोजी मुंबईत झाली. पक्षाची चार दशकांची वाटचाल ही अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आदी ज्येष्ठ नेत्यांच्या नेतृत्वाखाली झाली; पण नरेंद्र मोदी व अमित शहा यांचा देशाच्या राजकीय क्षितीजावर प्रवेश झाल्यापासून भाजपाची देशभर घोडदौड सुरू झाली. देशात गेल्या दहा वर्षांत एकवीस राज्यांत भाजपाची सत्ता आली; पण भाजपाच्या स्थापनेपासून गेल्या चव्वेचाळीस वर्षांत महाराष्ट्रात भाजपाची एकदाही स्वबळावर सत्ता स्थापन झाली नाही. आज देवेंद्र फडणवीस हाच भाजपाचा महाराष्ट्राचा चेहरा आहे. अर्थात मोदी व शहा यांचा फडणवीसांवर वरदहस्त आहे, म्हणून राज्यात फडणवीस हे भाजपाचे नंबर १ नेते आहेत.

सन २०१४ मध्ये देशात अनेक राज्यांत भाजपाची सत्ता आली. महाराष्ट्रात विधानसभेत १४४ हा बहुमताचा जादुई आकडा आहे. त्या निवडणुकीत भाजपाचे १२२ आमदार निवडून आले व नंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे समर्थन घेऊन भाजपाने पाच वर्षे युतीचे सरकार चालवले. अर्थातच त्या सरकारवर पूर्ण वर्चस्व भाजपाचे म्हणजे देवेंद्र फडणवीस यांचेच होते. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने ठाकरे यांच्या शिवसेनेची युती करून निवडणूक लढवली, पण पक्षाचे १०५ आमदार निवडून आले. आता २०२४ मध्ये एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस यांना बरोबर घेऊन भाजपा निवडणुकीच्या रणसंग्रामात उतरली आहे. मी पुन्हा येईन... असे २०१९ च्या निवडणूक प्रचारात देवेंद्र फडणवीस वारंवार सांगत होते, विरोधी पक्षांनी त्याची बरीच टिंगल-टवाळी केली, पण निकालानंतर देवेंद्र यांनी मुख्यमंत्री म्हणून व अजितदादांनी उपमुख्यमंत्री म्हणून सर्वात अगोदर शपथ घेतली; पण त्यांचे सरकार जेमतेम ८० तासच टिकले. त्यांचा पहाटेचा शपथविधी बरेच दिवस गाजत राहिला.

गेल्या दहा-अकरा वर्षांत काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसमधून अनेक दिग्गज नेते भाजपामध्ये आले. त्यांची यादी बरीच मोठी होईल, पण त्यामुळे भाजपाचा राज्यात विस्तार झाला. अनेक नेते चौकशीचा ससेमिरा चुकविण्यासाठी भाजपामध्ये आले, तर अनेकजण सत्तेच्या मोहापायी आले. असे असूनही लोकसभा निवडणुकीत मतदारांनी महाआघाडीचे (विरोधी पक्षांचे) ३१ खासदार निवडून दिले व भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी या महायुतीच्या १७ जणांना विजयी केले.

केंद्रात व राज्यात भाजपाचे सरकार असताना महायुतीला मोठा फटका बसला. भाजपाचे अगोदरच्या लोकसभेत २३ खासदार होते, यंदा केवळ नऊच विजयी झाले. केवळ भाषणबाजी करून नि घोषणांचा पाऊस पाडून, तसेच विरोधकांच्या पाठी ईडी-सीबीआय लावून मते मिळत नाहीत, हे आता लक्षात आले असावे. सत्तेत असलेल्या दोन प्रमुख पक्षांची केलेली तोडफोड जनतेला आवडलेली नाही, हा संदेश लोकसभा निकालाने दिला आहे. येत्या निवडणुकीत मोदींचा करिष्मा व दीड कोटी लाभार्थी लाडक्या बहिणी हाच आता महायुतीचा प्रमुख आधार आहे.

लोकसभेतील अपयश विसरा व उमेदीने कामाला लागा. प्रत्येक बूथवर २० सदस्य करा, प्रत्येक बूथवर १० कार्यकर्ते हवेत. मतदान १० टक्के वाढले पाहिजे. विधानसभेला फाजिल आत्मविश्वास असता कामा नये. गटबाजी टाळा, एकमेकांच्या विरोधात बोलू नका, वादग्रस्त विधाने टाळा, विरोधकांच्या फेक नॅरेटिव्हला लगेच उत्तर द्या, आदी सूचना पक्षाच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांना करण्यात आल्या. काहीही करा, फोडाफोडी करा पण सत्ता आणा, असेही आव्हान करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची मते भाजपाकडे वळली नाहीत म्हणून भाजपाचे नुकसान झाले, असा युक्तिवाद अगोदर संघाच्या मुखपत्राने केला व नंतर स्वतः फडणवीस तेच बोलू लागले. त्याच अजितदादांना बरोबर घेऊन भाजपा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरत आहे. आपले १०५ आमदार सांभाळा आणि मित्रपक्षांचेही रूसवे-फुगवे काढा, अशी कसरत भाजपाला करावी लागते आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या संस्काराच्या मुशीतून तयार झालेले मनोहर जोशी, नारायण राणे, एकनाथ शिंदे, असे राज्याचे तीन मुख्यमंत्री झाले. वडिलांच्या पुण्याईचा लाभ उद्धव ठाकरे यांनाही मिळाला, पण भाजपाला आजवर (देवेंद्र फडणवीस) एकदाच मुख्यमंत्रिपद मिळाले. सर्वाधिक आमदार असूनही गेल्या पाच वर्षांत भाजपाला (८० तास वगळून) मुख्यमंत्रिपद नव्हते. नोव्हेंबरमध्ये महायुतीला बहुमत मिळाले, तर पुढचे मुख्यमंत्रिपद कोणाला हे मात्र अजून गुलदस्त्यात आहे. पुन्हा एकनाथ शिंदे, की देवेंद्र फडणवीस, की पाच वेळा उपमुख्यमंत्री झालेले अजितदादा?

## भाष्य

# मराठीचे संवर्धन करणे आपलीच जबाबदारी!




**जगन घाणेकर**

9664559780


जगभरातील मराठी जनांना गेल्या अनेक दशकांपासून ज्याची प्रतीक्षा होती तो दिवस अखेर उजाडला. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी जे निकष असतात ते पूर्ण झाल्याने हा दर्जा मराठी भाषेला मिळाला आहे. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे ३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. ते आता मराठी भाषा संवर्धनासाठी मिळणार आहे. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ आणि साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यांसह इतर प्रकल्पांसाठी सरकारकडून आर्थिक पाठबळ दिले जाईल. अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. आता मराठी विद्वानांनाही हे पुरस्कार मिळतील. मराठीसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिज'ची स्थापना केली जाईल. भारतातील सर्व ४५० विद्यापीठांमध्ये आता मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था केली जाईल. मराठीतील प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाईल. असे बरेच लाभ मराठी भाषेला आता अधिकृतरीत्या मिळतील. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजारांहून अधिक मातृभाषा आहेत, तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी, यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हॉट्सॲप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जातात, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेट्स आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्त्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो, येणारा मराठी राजभाषा दिवस अधिक उत्साहाने साजरा होईल यात शंका नाही. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा तर मिळाला; मात्र तिचे संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारी आपलीच आहे, याचा विसर आपल्याला पडता कामा नये. आजमितीला मराठी भाषेची स्थिती पाहिल्यास दहापैकी ३ जणांना तरी शुद्ध मराठीत दहा ओळी म्हणता येतील का, हा प्रश्न आहे.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृभाषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यावहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्त्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृद्ध आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तीन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम 'मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपरिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे. केवळ अभिजात दर्जा मिळालेला म्हणून मराठीला लागलेली अवकळा थांबणार नाही.

घाटकोपर, मुंबई

## मनाचिये गुंती

# गृहिणींचे वेळापत्रक




**वैशाली पाटील**

9420350171


आपल्या प्रत्येकाच्याच आयुष्यात वेळापत्रकाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. प्रत्येक सर्वसाधारण माणसाची एक सामान्य दिनचर्या असते. ज्याचे काटेकोर पालन करूनच ते आयुष्यात प्रगती करू शकतात. एकंदरीत आपण सर्वच आपल्या एका ठराविक वेळापत्रकाचे पालन केल्याशिवाय आपल्या चोवीस तासांना उत्पादनक्षम बनवू शकत नाही. अन्यथा आपल्या आयुष्यातून तो क्षण कायमचा वजा होतो व निरर्थक जातो; परंतु असा एक वर्ग आहे ज्याचे कोणतेही ठरलेले वेळापत्रक नसते. या वर्गाला दिवसभरातील तास कमी पडतात. तो इतरांच्या वेळापत्रकानुसार आपले वेळापत्रक बदलवितो. ह्या जगावेगळया वर्गाचे नाव आहे ''गृहिणी''. गृहिणींना आपल्या घरासाठी व आपल्या माणसांसाठी त्यांनी कितीही केले तरी कमीच वाटते. त्यांना आपले विशिष्ट असे वेळापत्रक असावे, असे वाटतच नाही.

घर म्हणजे स्त्रियांचे हक्काचे क्षेत्र असते. त्या आपल्या दिनचर्येत घरासाठी एक वेळापत्रक बनवित असतात; मात्र केवळ घरातील कामांच्या व आपल्या माणसांच्या महत्त्वाच्या वेळाच यात टिपलेल्या असतात. स्वतःसाठी मात्र कोणतीही वेळ ठरविलेली नसते, कारण ते करणे त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. आणि आपणही कधी त्याविषयी दखल घेत नाही. घरातील एक माणूस दिवसरात्र फक्त सर्वांचाच विचार करत असतो, सर्वांच्या खाण्यापिण्यापासून सगळया आवडी-निवडी जपण्यासाठी झटत असतो; परंतु तिची ही निरपेक्ष घोडदौड आपण अगदी सहजपणे आपल्या नजरेआड करत असतो. ह्याचा अर्थ सर्वस्वी हाच होतो, की नशीबाने आपल्याला एक असे सोन्यासारखे माणूस लाभलेले असते जे हसत-हसत आपल्यासाठी समर्पण करण्यास तयार आहे; परंतु आपण मात्र त्याला आपला सेवक समजत आहोत. खरतर गृहिणीच्या संयमाची दाद द्यावीशी वाटते, की त्या आजीवन अशा स्थितीतही स्वतःला निश्चल ठेवू शकतात.

खरेतर गृहिणीच्या ह्या निरपेक्ष समर्पणाकरिता घरच्यांनी कायम त्यांचे ऋणी असले पाहिजे. स्त्रियांना आपला संयम पणास लावावा लागतो. कोणतीही गृहिणी कधीही आपले घर व आपल्या माणसांअगोदर स्वतःचा विचार करत नाही. म्हणूनच त्यांचे वेळापत्रक घरच्यांसाठी सोयीस्कर असते; पण स्त्रियांनी सक्षम व्हावे, असे आपणास वाटत असेल, तर त्यांचा वेळ कसा उत्पादनक्षम बनविता येईल ह्या विषयावर आवर्जून दृष्टिक्षेप टाकला गेला पाहिजे. घराचा कणा मजबूत ठेवायचा असेल, तर गृहिणींचे आरोग्य जपले गेले पाहिजे. घर हे गृहिणींचे कार्यक्षेत्र असल्यामुळे त्यांना आपल्या ठरलेल्या वेळापत्रकानुसार आपली दैनंदिन कामेही उरकायची असतात. त्यामुळे गृहिणींना व त्यांच्या वेळेला गृहीत धरणेच सोडले पाहिजे. 'ती घरीच तर असते', अशी वाक्ये सहजच तोंडून काढण्याअगोदर त्यांचे गृहिणी असलेल्या स्त्रियांच्या मनावर काय परिणाम होऊ शकतात ह्या गोष्टीचा नक्कीच सखोल विचार केला गेला पाहिजे. तेव्हा गृहिणींच्या वेळेचा आपल्या हिशोबाने वापर करणे आता कोठेतरी थांबविले पाहिजे. तेव्हाच त्यांच्या स्वप्नांची, त्यांच्या कल्पनाशक्तीची, तसेच त्यांच्यातील क्षमतांची पुन्हा भरभराट होईल. ज्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघेल. त्यांनी जर स्वतःसाठी राखीव वेळ ठेवलेला असला, तर त्यांच्या निर्णयाचा नेहमी सन्मान करावा. त्यांना वेळेची मुभा देऊन, त्यांची बाजू सांभाळून घेऊन त्यांचे सहकार्य केले पाहिजे.

वेळापत्रक बनविण्याचा अर्थच हा असतो, की आपल्या वेळेला एक योग्य दिशा व उद्देश मिळावा. त्याप्रमाणे वेळापत्रकानुसार आयुष्यात मार्गक्रमण करणारा व्यक्ती महत्त्वाकांक्षी असतो. गृहिणींना त्यांच्या आयुष्यात वेळापत्रकाचे महत्त्व कळले असेल, तर ते त्यांच्या हिताचे व त्यांच्यासाठी प्रगतीचे द्वार उघडणारे कसे ठरू शकते ह्याविषयी त्यांचे मार्गदर्शन करण्यात आले पाहिजे. त्यांनी जर आपल्या वेळेला शिस्त लावली, तर त्यांना स्वतःमध्येच एका प्रबळ उर्जेची जाणीव होऊ शकते. त्याचबरोबर त्या त्यांच्या कोणत्याही वयात व कशाही परिस्थितीत आपली कारकीर्द सुरू करण्याच्या दिशेने यशस्वी वाटचालही करू शकतात. म्हणूनच गृहिणींनी वेळापत्रक बनविताना त्यात स्वतःलाही महत्त्व दिले पाहिजे, कारण त्यांचा वेळ कसा व्यतीत होतो त्याचप्रमाणे कशाप्रकारच्या संगतीत व्यतीत होतो ह्या दोन गोष्टी त्यांचे सक्षम व उज्ज्वल भविष्य घडण्यासाठी फार महत्त्वाच्या असतात.

स्त्रिया आपल्या पदरात आपल्या माणसांची स्वप्न व इच्छांना सजवून व प्रेमाने जोपासून ठेवत असतात आणि ती स्वप्न पूर्ण व्हावीत म्हणून आपल्या वेळेची व भावनांची गुंतवणूक आजीवन त्यात करत असतात. हा स्त्रियांच्या समर्पणाचा भाग आहे; परंतु जेव्हा गृहिणी स्वतःचे वेळापत्रक बनविण्याचे धाडस करतात तेव्हा त्यांच्या आयुष्यात सकारात्मकरित्या हालचाल होते. त्याचे वेगळे व्यक्तिमत्त्व तयार होते, कारण त्यावेळी त्यांना स्वतःची किंमत कळलेली असते.

## वाचक विचार मंच

# स्वच्छतेच्या बाबतीमध्ये ग्रामीण भाग दुर्लक्षित!

शासन ग्रामविकासासाठी व जनतेच्या हितासाठी कटिबद्ध आहे; मात्र ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शासनिधी येऊनही दर्जात्मक व पारदर्शक विकासकामे होत नाहीत. यामुळे ग्रामीण भागात भ्रष्टाचार पसरायला वेळ लागत नाही. आज स्वच्छतेच्या बाबतीमध्ये ग्रामीण भागात दुर्लक्षच झाल्याचे दिसून येते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी केवळ सर्वत्र गाजावाजा होताना दिसतो. शहरात स्वच्छता होत असली, तरी ग्रामीण भागात मात्र अस्वच्छतेचा कळसच पहायला मिळतो. स्वच्छतेच्या बाबतीमध्ये शासनाच्या डझनभर योजना कार्यान्वित आहेत, मात्र या योजनांचा परिणाम ग्रामीण भागात फारसा झालेला दिसून येत नाही, हे वास्तव आहे. आजही यासंबंधीची कामे थातुरमातूर पध्दतीने उरकून शासनदप्तरी केवळ शासननिधी खर्च झाल्याचे आढळून येते.



शासनस्तरावर याबाबत विचारविनिमय करण्याची नितांत आवश्यकता आहे. ग्रामीण भागाचा विकास खऱ्या अर्थाने साधायचा झाल्यास व्यापक जनजागृती बरोबरच याकामी एकत्रितपणे लोकसहभागाबरोबर शासनाचाही पुढाकार असणे गरजेचे आहे. तेव्हाच ग्रामीण भागातील अस्वच्छतेचा कळस कमी होईल.

**- सचिन ज. नागरे,**
मु. पो. किनगाव जट्टू, ता. लोणार,
जि. बुलढाणा
मो. नं.: ९६०४३२१४३२

## गुल्लेर

# तूच लाव




**नरेंद्र इंगळे**

9561226572


'साहेब आहेत काय घरी?'

'कोन आहे?'

'मी एमटेक कंपनीचा एजंट आहो.. प्रॉडक्ट दाखवाले आलो.'

'मले काही ना पाह्यजे.'

'पाहून त घ्या.. हे बॉटल पाहा.. आम्लपित्त, बिपी, शुगर.. सरदर्द.. रोजची एक गोळी घ्या लागते.. किंमत फक्त अठराशे रुपये.. अमित शहा हेच गोई घेतात.'

'त्यालेच दे.. लुटून राह्यला काय बे?'

'कंपनी इंटरनॅशनल आहे. विदेशातून माल येते. हे पहा पुस्तक.'

'मले पुस्तक दाखवू नको.'

'तुमची खात्री पटली पाह्यजे.. हे मॅडमसाठी क्रीम घ्या.. आठ दिवसात बाई गोरी होते.'

'पलट्या मारु नको.. अशी कोनतीच क्रीम नाही. असं झालं असतं तर दक्षीन आफ्रिकेतल्या लोकाईनं हेच क्रीम वापरली असती.'

'कॉलिटीचा फरक आहे. हे फक्त हायफाय लोकं वापरतात. निता अंबानी हेच वापरते. फक्त पाचशे वीस रुपये.'

'चिवत्या समजून राह्यला काय? शंभराची वस्तू पाचशात विकून राह्यला?'

'बरं हे साबन घ्या. पंचाहत्तर रुपयाचं.'

'यात काय विशेष आहे?'

'हे एकडाव लावलं की दिवसभर आंगाचा वास जात नाही.'

'लय महाग आहे तुव्ह सामान.'

'मंग तुम्ही एजंट व्हा.'

'एजंट होऊन काय करु?'

'घरोघरी फिरत जा.. तुमाले तीस टक्के कमिशन भेटते.. धंदा वाढला की अमेरिका, सिंगापूरचा मोफत प्रवास.. फाईव्ह स्टार हाटेलात मुक्काम.'

'तू किती दिवसाचा धंदा करुन राह्यला?'

'अडीच वर्षे झाले.'

'तू गेलता काय अमेरिकेले?'

'आजून गेलो नाही.'

'मंग कायले चाटा मारुन राह्यला?'

'चाटा नाहीत. मुंबईच्या एका एजंटनं आताच अठरा लाखाची गाडी घेतली.. हा पाहा तो मानूस.'

'तो फोटो तुह्यापाशीच ठेव.. हे क्रीम तूच लाव अन गोरा व्हय.. आला तसा वापस जाय.. मी फाटक लाऊन घेतो.'

### कौल कुणाला?

एकतर्फी होईल म्हणतात
हरियाणाची निवडणूक
म्हणूनच 'कमळा'ईच्या
'परिवारा'ची वाढली धाकधूक

मजबूत पकड आहे
म्हणतात यंदा 'हातां'ची
मतदारांनी उधळण
केली आहे मतांची

पुन्हा एकदा सत्तेत
येणार आहे 'आय'
निकाल लागल्यावर कळेल
कुणाचे होणार काय

जनतेच्या मनात काय
हे सांगता येत नाही आज
बघू या कुणाचे किती
खरे ठरतात अंदाज

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# पक्षांतरे करण्याची किंमत मोजावी लागणार!

राज्य विधानसभा निवडणुकीचा काळ जवळ आला आहे हे ओळखून आपल्याला उमेदवारी मिळणार नाही किंवा मतदारसंघ बदलला जाईल किंवा आपल्या पक्षाचे काही खरे नाही, अशा प्रकारच्या अपेक्षांनी अनेकांकडून राजकीय पक्ष बदलणे या काळात सुरू होत असते. पक्षाचे तिकीट मिळविण्यात जेव्हा साशंकता निर्माण होऊन काही संभाव्य उमेदवार वैयक्तिक स्वार्थासाठी पक्ष सोडून उघडपणे किंवा गुपचूपपणे विरोधातल्या उमेदवाराला पाठिंबा देणे पत्करतात, त्यांना दलबदलू अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. अशा दलबदलूंना उमेदवारी जाहीर करून राजकीय पक्ष आपल्या विरोधी पक्षांवर कुरघोडी करण्याची संधी साधतात. यावेळी पक्षावरची निष्ठा आणि मागील काळात केलेले पक्षकार्य विसरून बाहेरच्यांना दिलेल्या उमेदवारीने नाराज झालेले एकनिष्ठ कार्यकर्ते दुरावतात, ज्यांची नाराजी मतदानावर परिणाम घडवून आणण्यास कारणीभूत ठरते. कारण काही राजकीय पक्षांकडून त्यांच्या विश्वासार्ह सेवकांना तिकिटे नाकारली जाऊन त्यांचे विरोधी पक्षांमध्ये जाण्याचे मार्ग मोकळे केले जातात. ह्या साऱ्या निवडणुकीपूरत्या जाणीवपूर्वक समझोते केलेल्यांचे निवडणूक निकालानंतर पितळ उघडे पडते. देशासह महाराष्ट्रातील मतदारांत सुशिक्षित आणि तरुण युवकांचा सहभाग वाढत आहे.

जे मतदार विचार करून मतदान करताना नेत्यांच्या भाषणबाजीला ऐकून घेतात आणि आपला स्वतंत्र हक्क बजावण्यासाठी मतदान करताना दिसत आहेत त्यामुळेच मतदानाचा टक्का वाढण्याच्या शक्यता अधिक आहेत. अशा बऱ्याच प्रकारांचा अभ्यास केलेल्या महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यापूर्वी काही निकष जपण्याची आणि विचारविनिमय करण्याची आवश्यकता आहे, असे आवाहन केले आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणुकांमधील मूल्यांचे आणि नैतिकतेचे राजकारण संपविले गेले आहे आणि त्यांना राज्याच्या राजकारणात पुन्हा मूल्ये आणि नैतिकता रुजविण्याची भूमिका पार पाडण्यासाठी सांविधानिक जबाबदारी निभावण्याची अपेक्षा आहे. तसे करण्याने मूल्ये आणि निष्ठेचा आदर राखला जाईल व मतदानात वाढ होईल. वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षांतरे करणाऱ्यांवर वचक निर्माण होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले आहे. तुषार गांधी यांच्या आवाहनास राजकीय पक्ष, पक्षनेते आणि मतदार यांच्याकडून किती प्रतिसाद मिळाला हे निवडणूक निकालानंतर स्पष्ट होईल.

**राजन पांजरी**
जोगेश्वरी पूर्व, मुंबई, मो. नं.: ९८१९७००८१८

# डबल इंजिन सरकार म्हणजे दुहेरी लूट

## अरविंद केजरीवाल यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन



**नवी दिल्लीः** डबल इंजिन सरकार म्हणजे दुहेरी लूट आहे. गेल्या सात वर्षांपासून यूपीमध्ये दुहेरी इंजिनचे सरकार आहे, पण ते अपयशी ठरले आहे. दिल्लीतील जनतेचे प्रेम, पाठिंबा आणि विश्वास माझ्या प्रामाणिकपणाचा पुरावा ठरेल, असे प्रतिपादन आम आदमीए पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी म्हटले आहे.

दिल्लीतील छत्रसाल स्टेडियमवर आम आदमी पक्षातर्फे जनता की अदालत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जनतेला संबोधित करताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, २२ राज्यांमध्ये त्यांची (भाजप) सरकारे आहेत. तुम्ही त्यांना एका राज्याचे नाव सांगा जिथे त्यांनी वीज मोफत दिली आहे. ते ३० वर्षांपासून गुजरातमध्ये सत्तेत आहेत.

# जम्मू- काश्मीरमध्ये भाजप सरकार स्थापन करेल- ब्रिजभूषण

देशोन्नती वृत्तसंकलन



**नवी दिल्लीः** हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. आता आठ निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. पण त्याआधी सर्व एक्झिट पोल जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेस-एनसी युती आणि हरियाणामध्ये काँग्रेस सरकार स्थापन करण्याचा दावा करत आहेत. याबाबत सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या प्रतिक्रिया उमटत आहे. यात भारतीय कुस्ती महासंघाचे माजी प्रमुख आणि भाजप नेते ब्रिजभूषण शरण सिंह यांचे वक्तव्यही समोर आले आहे. त्यांना विचारण्यात आले की, हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये सरकार कोण बनवेल, यावर ते म्हणाले की, जम्मू-काश्मीरमध्ये भारतीय जनता पक्ष (भाजप) सरकार स्थापन करेल.

# नदीत आंघोळीसाठी गेलेल्या ७ मुलांचा बुडून मृत्यू!

देशोन्नती वृत्तसंकलन

**रोहतास :** जिल्ह्यातील तुंबा गावातून एक हृदयद्रावक बातमी समोर आली आहे. येथे सोन नदीत आंघोळ करताना सात मुलांचा बुडून मृत्यू झाला, त्यापैकी पाच मुलांचे मृतदेह सापडले आहेत तर दोन मुलांचा शोध सुरू आहे. सर्व मुले एकाच कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येत आहे. या अपघातानंतर संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. रविवारी सकाळी कृष्णा गोंड यांची चार मुले आणि त्यांच्या बहिणीच्या मुलीसह सात मुले आंघोळीसाठी सोन नदीवर गेले होते. आंघोळ करत असताना

### दोन बेपत्ता मुलांचा शोध सुरू

अचानक सर्व मुले खोल पाण्यात गेली आणि बुडू लागली. स्थानिक लोकांनी तातडीने घटनास्थळ गाठून पाच मुलांचे मृतदेह बाहेर काढले, मात्र दोन मुले अद्याप बेपत्ता आहेत. प्रत्यक्षदर्शी गोलू कुमार यांनी सांगितले की, आम्ही सोन नदीत आंघोळीसाठी गेलो होतो. आंघोळ करत असताना एक मुलगा बुडू लागला. त्याला वाचवण्यासाठी आम्ही सर्वांनी पाण्यात उड्या मारल्या, पण आम्ही स्वतःही बुडू लागलो.



**तिरुपती :** येथील भगवान व्यंकटेश्वर मंदिरातील लाडू प्रसादाची गुणवत्ता वाढल्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केल्याचा दावा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी केला.

# चीनने अमेरिकन न्यायालय प्रणाली केली हॅक!

## चीनच्या मंत्रालयाचा प्रतिसाद नाही

देशोन्नती वृत्तसंकलन



**वॉशिंग्टन :** चिनी हॅकर्सनी अमेरिकन ब्रॉडबँड प्रोव्हायडर नेटवर्क हॅक करून खळबळ उडवून दिली आहे. फेडरल सरकार कोर्ट-अधिकृत वायरटॅपिंगसाठी मिळवलेली माहिती वापरते. वॉल स्ट्रीट जर्नल नुसार, चीनने अमेरिकन कोर्टाची संपूर्ण वायरटॅप प्रणाली हॅक केली आहे. डब्ल्यूएसजेने या प्रकरणाशी परिचित असलेल्या अनेक लोकांचा हवाला देत म्हटले आहे. अमेरिकेतील Verizon Communications, AT&T आणि Lumen Technologies या टेलिकॉम नेटवर्किंग कंपन्यांपैकी आहेत ज्यांना अलीकडे घुसखोरी आणि उल्लंघन आढळले आहे.

# मॅक्रॉनन इस्त्रायलच्या पाठीशी उभा राहणार

वृत्तसंस्था



**पॅरिस :** फ्रान्सने इस्रायलला होणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यावर बंदी घालण्याची मागणी केल्याच्या मुद्द्याने आता जोर पकडला आहे. फ्रान्सच्या या पावलानंतर इस्रायलच्या पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांना फटकारल्यानंतर मॅक्रॉनचा सूरही बदलला. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी मॅक्रॉनला सांगितले. नेतन्याहू यांनी फ्रान्स आणि इतर पाश्चात्य नेत्यांना इस्रायलला शस्त्र पुरवठ्यावर बंदी घालण्याचे आवाहन केल्यानंतर एक निवेदन जारी केले.



# योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते महाकुंभमेळा वेबसाइट आणि ॲप लॉन्च

# महाकुंभमेळाच्या लोगोचे अनावरण

देशोन्नती वृत्तसंकलन

**प्रयागराजः** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज रविवारी (दि. ६) प्रयागराजमध्ये महाकुंभ-२०२५ च्या लोगोचे अनावरण आज करण्यात आले. या सोबतच महाकुंभ मेळयासाठी वेबसाइट आणि ॲपचे देखील लॉन्चिंग झाले. प्रयागराजमध्ये होणाऱ्या महाकुंभ-२०२५ साठीच्या लोगोमध्ये कुंभ राशीचे चिन्ह कलश आहे. ज्यामध्ये ओम लिहिलेले आहे. मागे संगमाचे दृश्य आहे. तसेच भगवान हनुमानजींचे चित्र व मंदिर आहे. अनावरणासोबतच मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि जलशक्ती मंत्री स्वतंत्र देव सिंह यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसोबत महाकुंभाच्या तयारीची आढावा बैठक झाली. अखिल भारतीय आखाडा परिषदेने कुंभ आणि महाकुंभ दरम्यान विविध आखाड्यांमधील शाहीस्नान आणि पेशवाई या उर्दू-फारसी शब्दांऐवजी हिंदी-संस्कृत शब्द वापरण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. यासोबतच गायीला राष्ट्रमाता घोषित करणे, मंदिरांमधील सरकारी हस्तक्षेप दूर करणे, देशभर समान नागरी कायदा लागू करणे यासह अन्य ठरावही मंजूर करण्यात आले आहेत.

### वेबसाइट मार्गदर्शक म्हणून करेल काम

२०२५ मध्ये होणाऱ्या महाकुंभ मेळयासाठी तयार करण्यात आलेल्या वेबसाइट आणि ॲपमध्ये अनेक वैशिष्ट्ये आहेत. महाकुंभ २०२५ चा लोगो महाकुंभ वेबसाइट आणि ॲपवर इतर प्रचार माध्यमांसह वापरला जाईल. भाविक आणि पर्यटकांना महाकुंभला विमान, रेल्वे आणि रस्ते मार्गाने पोहोचण्यासाठी वेबसाइट मार्गदर्शक म्हणून काम करेल. याद्वारे प्रयागराजमधील निवास व्यवस्था, स्थानिक वाहतूक, पार्किंग, घाटावर जाण्याचे दिशानिर्देश आदींची माहिती उपलब्ध होणार आहे. यात स्थानिक आणि जवळपासची आकर्षणे आणि पर्यटन स्थळांसाठी मार्गदर्शक देखील आहेत. जत्रेच्या परिसरात कसे जायचे आणि धार्मिक कार्यात सहभागी कसे व्हावे याबद्दल तपशीलवार माहिती दिली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# गाझ्मातील मशिदीत 'हमासचा तळ'

देशोन्नती वृत्तसंकलन

### इस्रायलच्या हवाई हल्ल्यात २४ ठार

**गाझा :** इस्रायलने आज गाझा मशिदीवर हवाई हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात २४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ९३ जण जखमी झाले आहेत. पॅलेस्टिनी वृत्तसंस्था वाफाने ही माहिती दिली. मध्य गाझा पट्टीतील देर अल-बालाह येथील अल-अक्सा रुग्णालयाजवळील मशिदीवर हा हल्ला झाला. मशिदीत विस्थापित लोकही राहत असल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

इस्रायलच्या लष्कराने हवाई हल्ल्याबाबत जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देयर अल-बालाह भागातील शुहादा अल-अक्सा मशिदीमध्ये उपस्थित हमासच्या दहशतवाद्यांवर अचूक हल्ला करण्यात आला. हे दहशतवादी कमांड चालवत होते. आणि येथून नियंत्रण केंद्र.'



गाझामधील धार्मिक व्यवहार मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, गाझामधील १,२४५ मशिदींपैकी ८१४ मशिदी नष्ट झाल्या आहेत आणि आणखी १४८ मशिदींसोबतच १९ चर्चही उद्ध्वस्त झाल्या आहेत. ६० स्मशानभूमींपैकी ज्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले गेले होते ते मंत्रालयाच्या मालमत्तेचे अंदाजे आर्थिक खर्च ३५० दशलक्ष आहे गाझामधील धार्मिक व्यवहार मंत्रालयाने इस्रायलवर कबरींची विटंबना करणे, मृतदेह खोदणे आणि मृतांविरुद्ध हिंसाचार केल्याचा आरोप केला आहे.

# मशिदीचे बांधकाम पाडण्याचा आदेश

**शिमला :** हिमाचल प्रदेशची राजधानी शिमला येथील वादग्रस्त संजौली मशिदीचे बेकायदेशीर बांधकाम पाडण्याचा आदेश शिमला महानगरपालिकेच्या आयुक्तांनी दिला आहे. त्यानुसार आता या मशिदीचे तीन बेकायदा मजले पाडण्यात येणार आहेत. या मशिदीच्या विरोधात काही दिवसांपूर्वी स्थानिक जनतेने आणि हिंदू संघटनांनी मोठे आंदोलन केले होते. ही मशीद सरकारी जागेवर अतिक्रमण करुन बांधण्यात आली आहे, असा आंदोलकांचा आक्षेप होता. तसेच या मशिदीच्या आसपास घुसखोरांनी वस्ती केली असून त्यामुळे या भागात गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचाही स्थानिकांचा आरोप आहे.

# एकाच वेळी निवडणुका घटनाबाह्य नाहीत - रामनाथ कोविंद

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** एक राष्ट्र, एक निवडणूक या संकल्पनेवर स्थापन करण्यात आलेल्या समितीचे अध्यक्ष माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सांगितले की, एकाच वेळी निवडणुका घेण्याची कल्पना संविधान निर्मात्यांची होती, त्यामुळे ती असंवैधानिक असू शकत नाही. ते म्हणाले की, अंमलबजावणी समिती एक देश एक निवडणूक लागू करण्यासाठी विविध घटनादुरुस्तींवर विचार करेल आणि त्यानंतर संसद अंतिम निर्णय घेईल. दिल्लीत लाल बहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ आयोजित व्याख्यान देताना माजी राष्ट्रपती कोविंद म्हणाले की, १९६७ पर्यंत पहिल्या चार लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या.



निवडणूक आयोगासह अनेक संस्थांनी यापूर्वी या संकल्पनेला पाठिंबा दिला आहे. एकाचवेळी निवडणुका घेतल्याने संघवाद आणखी मजबूत होईल, कारण तिन्ही स्तरांची सरकारे पाच वर्षे एकत्र काम करतील. 'एक राष्ट्र, एक निवडणूक' हा लोकप्रिय वाक्प्रचार आहे, ज्याचा काही लोकांनी चुकीचा अर्थ लावला आहे, असेही कोविंद म्हणाले. याअंतर्गत एकच निवडणूक होणार असून यापुढे निवडणुका होणार नाहीत, असा समज निर्माण झाला आहे.

# पाकिस्तानात इम्रान खानंचा पक्ष पुन्हा रस्त्यावर !

### रावळपिंडी, इस्लामाबादमध्ये मोबाईल सेवा बंद

वृत्तसंस्था

**रावळपिंडी :** पाकिस्तानमध्ये इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाने सलग दुसऱ्या दिवशी सरकारविरोधातील आंदोलन सुरु ठेवले आहे. यामुळे रविवारी (दि. ६) सलग दुसऱ्या दिवशी राजधानी इस्लामाबादमध्ये तणावपूर्ण वातावरण कायम आहे. दरम्यान, इम्रान खान यांच्या आदेशानंतर आंदोलन मागे घेतले जाईल, असेही पक्षाने स्पष्ट केले आहे.

पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ पक्षाचे संस्थापक आणि माजी पंतप्रधान इम्रान खान यांना पाकिस्तान सरकारने विविध



आरोपांखील ५ ऑगस्ट २०२३ रोजी अटक केली होती. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले आहे. सध्या ते रावळपिंडी येथील आदिलाला कारागृहात आहेत. या कारवाईविरोधात खैबर पख्तुनख्वाचे तेहरीक-ए-इन्साफ पक्षाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूर यांनी गेल्या महिन्यात मोठ्या राजकीय आंदोलनाची घोषणा केली होती. एका वर्षाहून अधिक काळ ते कारागृहात आहेत. इम्रान खान यांच्या सुटकेच्या मागणीसह न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि वाढत्या महागाईचा निषेध करणे हे आंदोलन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. शनिवारपासून सरकारविरोधातील आंदोलन सुरु झाले आहे.

# इराणच्या अणुकेंद्रांवर हल्ल्याची योजना?, अमेरिकेचा विरोध पण इस्त्रायलची सज्जता

वृत्तसंस्था

**जेरुसलेम :** इराणच्या अणुकेंद्रांवर हल्ला करण्याची योजना इस्रायलने सज्ज केली आहे, अशी सूत्रांची माहिती आहे. मात्र् अद्याप यासंबंधी अधिकृत भाष्य करण्यात आलेले नाही. अमेरिकेने अशा कोणत्याही योजनेला आपला विरोध असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र, इस्रायलने सर्व प्रकारची सज्जता केली असून अणुकेंद्रांना लक्ष्य बनविले जाणार नाही, असे



आश्वासन अद्यापही अमेरिकेला दिलेले नाही, अशीही माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे मध्यपूर्वेतील संघर्ष वाढण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील संघर्षाची तीव्रता प्रमाणाबाहेर वाढू नये, यासाठी अमेरिकेने जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत.

# सहारनपूरमध्ये पोलीस चौकीवर दगडफेक !

देशोन्नती वृत्तसंकलन

**सहारनपूर :** उत्तर प्रदेशातील सहारनपूरमध्ये पोलिस चौकीवर दगडफेक झाल्यानंतर खळबळ माजल्याचे वृत्त आहे. यती नरसिंहानंद यांनी पैगंबराचा अनादर करण्याबाबत निवेदन दिल्यानंतर मुस्लिम तरुणांनी पोलिस चौकीत गोंधळ घातला आणि त्यानंतर दगडफेक सुरू केली. परिसरात मोठा

### वादग्रस्त वक्तव्यावरून गदारोळ

पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी दंगलखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी दगडफेक सुरू केली. गोंधळ घालणाऱ्या तरुणांचा पोलिसांनी पाठलाग केला.

या प्रकरणी भाजपचे आमदार नंदकिशोर गुर्जर यांनी निवेदन दिले असून, डासना मंदिरावर हल्ला करणाऱ्यांचा एन्काउंटर व्हायला हवा. ते म्हणाले की, गोंधळ घालणाऱ्यांवर एनएसए अंतर्गत कारवाई झाली पाहिजे. हा हिंदूंच्या श्रद्धेवरचा हल्ला आहे, यामुळे लोक संतापले आहेत. मंदिरावरील हल्ल्यात दहशतवाद्यांचा हात आहे. सहारनपूरच्या ग्रामीण भागातील कोतवाली भागातील शेखपुरा कादीम गावातील



शेकडो लोक काही संघटनांसह गावात असलेल्या पोस्टवर निवेदन देण्यासाठी आले होते. गाझियाबादच्या यति नरसिंहानंद यांनी पैगंबराच्या सन्मानार्थ केलेल्या बेताल वक्तव्याविरोधात हे लोक निदर्शने करत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकांनी आधी पोलिस चौकीत निवेदन दिले मात्र त्यानंतर गावातील काही तरुणांनी पोलिस चौकीवर दगडफेक करून तेथे गोंधळ घातला.

# वृद्धांना तरुण बनवण्याच्या नावाखाली फसवणूक

**कानपूर :** उत्तर प्रदेशातील कानपूरमधून एक अनोखा प्रकार समोर आला आहे. येथे एका जोडप्याने वृद्धांना तरुण बनवण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. या जोडप्याने दावा केला होता की त्यांच्याकडे इस्त्रायली तंत्रज्ञानाने बनवलेले मशीन आहे, जे ६० वर्षांच्या व्यक्तीला २५ वर्षांचे दिसू शकते.

# डंपरने बसस्थानकावरील उभ्या लोकांना चिरडले

### अपघातात ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू !

देशोन्नती वृत्तसंकलन

**दौसा :** जिल्ह्यातील लालसोट बसस्थानकावर भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरने बसस्थानकावर उभ्या असलेल्या लोकांना आणि अनेक दुचाकीस्वारांना चिरडले. या अपघातात ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून १० जण गंभीर जखमी झाले आहेत. डंपरचा ब्रेक निकामी झाला होता, त्यानंतर तो बसला धडकला आणि लोकांच्या गर्दीत घुसला, असे सांगण्यात येत आहे. दोन्ही गाड्यांखाली १५ जण दबले गेले. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. सर्व गंभीर जखमींना लालसोट आणि दौसा येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



**अहमदाबादः** अदाणी विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ शांतीग्राम कॅम्पसमध्ये झाला. दीक्षांत समारंभात एमबीए (इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट), एमबीए (एनर्जी मॅनेजमेंट) आणि एमटेक (कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट) प्रोग्रामच्या ६९ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

# ९ महिन्यांत ६७ जणांचा बुडून मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

**पणजी :** गेल्या काही दिवसांत राज्यात समुद्र, नदी किंवा अन्य पाणथळ ठिकाणी मृतदेह आढळण्याचे प्रमाण वाढले आहे. राज्यात जानेवारी ते सप्टेंबर या ९ महिन्यांत ६७ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. यामध्ये आत्महत्या केलेल्या व्यक्तींचाही समावेश आहे. दरम्यान, सर्वाधिक १० घटना पणजी आणि आजूबाजूच्या परिसरातील आहेत. अग्निशामक दलाकडून ही माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वरील कालावधीत अग्निशामक दलाला बुडण्याच्या घटनांबाबत १०८ कॉल आले होते. यामध्ये ६७ जणांचा बुडून मृत्यू झाला तर ४ जणांना वाचवण्यात यश आले.

लोटली, मुळगाव, केपे येथे बुडून मृत्यू झाल्याच्या प्रत्येकी ४ घटना घडल्या होत्या. चिंचणी, म्हापसा, पेन्हा दी फ्रांका आणि ताळगाव येथून प्रत्येकी एक घटना घडल्या होत्या. तर हणजूण, असोळणा, कळंगुट, काणकोण, कुडतरी, कांदोळी, करमळी, दुर्भाट, शिरदोन, गांजे येथे बुडून मृत्यू पावण्याच्या प्रत्येकी २ घटनांची नोंद झाली आहे.

### ७७ टक्के मृत्यू बुडून

जानेवारी ते सप्टेंबर महिन्यात राज्यात विविध आपत्कालीन परिस्थितीत ८६ जणांना मृत्यू आला होता. यातील ६७ म्हणजेच ७७ टक्के मृत्यू हे बुडून झाले होते. वरील कालावधीत अग्निशामक दलाला ४०५ व्यक्ती तर ५४३ जनावरांना वाचवण्यात यश आले. अग्निशामक दलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मागील ९ महिन्यांत सप्टेंबरमध्ये सर्वाधिक १३ जणांचा बुडून मृत्यू झाला होता. यानंतर जुलैमध्ये ११, ऑगस्ट आणि मे मध्ये प्रत्येकी ९, एप्रिलमध्ये ८, फेब्रुवारीत ६, जून आणि मार्चमध्ये प्रत्येकी ४ तर जानेवारी महिन्यात ३ जणांचा बुडून मृत्यू झाला होता.

### अग्निशामक दलाकडून माहिती



# बुलेट ट्रेनसाठी पूल उभारण्याचे काम सुरू

**वसई :** मुंबई-अहमदाबाद या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या बुलेट ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातून जातो. त्यामुळे पालघर जिल्ह्यात वैतरणा खाडीवर त्यासाठी २. ३२ किलोमीटर लांबीचा पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या निर्मितीच्या कामासाठी खाडीवर एका तात्पुरत्या पुलाच्या उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे.

# भक्तीगडावर दसरा मेळाव्याच्या तयारीला वेग!

**अध्यात्मिक** राष्ट्रसंत भगवान बाबांचे जन्मगांव स्वागतासाठी सज्ज

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव घाट येथील भगवान भक्तीगडावर सध्या दसरा मेळाव्याच्या तयारीने वेग घेतला आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दरवर्षी हा परंपरागत दसरा मेळावा अलोट जनसागराच्या साक्षीने मोठया उत्साहात पार पडत असतो, यंदाच्या या मेळाव्याकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. दरम्यान जिल्हा प्रशासनाने मेळाव्याला परवानगी दिली आहे.

येत्या १२ तारखेला दसरा आहे, त्या अनुषंगाने 'आपला दसरा, आपली परंपरा' जपण्यासाठी संपूर्ण सावरगांव नगरी सज्ज होत असून सर्व ग्रामस्थ एकजुटीने कामाला लागले आहेत. मेळाव्याच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांच्या राज्यभरात ठिक ठिकाणी बैठका सुरू आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी दसरा मेळाव्याची परंपरा सुरू केली होती ती परंपरा पुढे भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी अखंडपणे सुरू ठेवली आहे. मागील दहा वर्षांपासून संत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव येथे हा दसरा मेळावा होत असून त्यांनी ग्रामस्थांच्या मदतीने याठिकाणी संत भगवान बाबा यांचे भव्य दिव्य स्मारक उभारून परिसराला 'भगवान भक्तीगड' असे नांव दिलेले आहे.



## पंकजाताईंचे होणार जोरदार स्वागत

भगवान भक्तीगडावरील १८ एकर परिसरात हा मेळावा होणार असून डागडूजी, परिसराची स्वच्छता आणि इतर कामांनी वेग घेतला आहे. पंकजाताई मुंडे यांच्या स्वागताची देखील ग्रामस्थांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मेळाव्यास राज्याच्या कानाकोपर्यातून तसेच बाहेरूनही लाखोंच्या संख्येने भाविक येतात, त्यांची गैरसोय होऊ नये याची खबरदारी घेण्यात येत आहे.

# नारायणगड येथे पारंपरिक दसरा!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे मराठा संघर्षयोद्धा मा. मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत पारंपारिक भव्य दसरा मेळावा संपन्न होत आहे.

आज नियोजन निमित्ताने भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी नारायण गड येथे महंत शिवाजी महाराज यांची भेट घेतली. यावेळी विश्वस्त दिलीप अण्णा गोरे ॲड. महादेव तुपे, बी.बी जाधव, राजेंद्र मस्के, बळिराम गवते, बालाजी पवार, बापूराव जाधव, मेंबर सचिन मस्के, अण्णासाहेब मस्के, हनुमंत मस्के, युवराज मस्के, रसाळ सर, शरद बडगे, महेश सावंत, वसंत गुंदेकर, राकेश बिराजदार, मारोती तिपाले, बद्रिनाथ जटाळ, बहिर सर, सचिन आगाम, अविनाश नवले, धनराज गवळी आदी उपस्थित होते.

# दिव्यांगांसाठी सर्वात जास्त सुविधा देणार!

## धनंजय मुंडे : परळीत मोफत श्रवण यंत्र शिबिर



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांतून दिनांक ७ ऑक्टोबर व ८ ऑक्टोबर रोजी श्रीनाथ हॉस्पिटल येथे कमी ऐकू येणाऱ्या / कर्णबधिर रुग्णांसाठी मोफत डिजिटल श्रवणयंत्र (कानाच्या मशीन) वाटप शिबीर अतिशय यशस्वी पणे संपन झाले.तब्बल १००० कर्णबधिर नागरिकांना या डिजिटल श्रवण यंत्रांचे मोफत वाटप करण्यात आले आणि ३७०० पेक्षा जास्त नवीन नागरिकांनी आपली नाव नोंदणी केली. अशी माहिती दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष व शिबिराचे संयोजक डॉ. संतोष मुंडे यांनी दिली.या भव्य मोफत शिबिराचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री ना.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते झाले.

या प्रसंगी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख जिल्हा शल्य चिकित्सक डॉ .थोरात साहेब,श्रीनाथ मानव सेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ एकनाथ मुंडे,बीड जिल्ह्याचे गटनेते अजयजी मुंडे,परळी तहसीलचे उपविभागीय अधिकारी लाटकर साहेब, तहसीलसर व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार रुपणर साहेब,राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके ,परळी मेडिकल असो.अध्यक्ष डॉ.शालिनीताई कराड ,सचिव डॉ. मनोज मुंडे ,पवन मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.शिबिराच्या उद्घाटप्रसंगी बोलताना परळी हा येणाऱ्या काळात दिव्यांगांसाठी शक्य तितक्या सुविधा उपलब्ध करून पान २ वर...

# नाट्यगृह नामकरणाचा मांडला ठराव!

## आ.लक्ष्मण पवार : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नामकरण



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील कोल्हेर रोड येथे वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी आ.लक्ष्मण पवार यांनी दि.७ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे केली होती आ.लक्ष्मण पवार यानी केलेल्या मागणीची दखल घेत गेवराई नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी विक्रम मांडरके यानी घेतलेल्याल्या बैठकीत आ.लक्ष्मण पवार यांच्या आलेल्या पत्रावर कोल्हेररोड वरील उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाचे पान २ वर...



बीड : शिवसेनेचे नेते,खा. डॉ.श्रीकांत शिंदे हे बीडमध्ये आले असता, यावेळी महायुतीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्यावतीने विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी नगरसेवक शुभम धूत, राष्ट्रवादी लिगल सेलचे जिल्हाध्यक्ष ड.नागेश तांबारे, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, राष्ट्रवादी विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे आदी.

# दांडी बहाद्दरांवर कारवाई करा

## निलेश शिरसाठ:राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसची मागणी

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील कृषी कार्यालयात अधिकारी व कर्मचारी शासकीय वेळेनुसार हजर न राहता मर्जीनुसार कार्यालयात येणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना बडतर्फ करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसने (अजित पवार गट) कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे राहुरी शहराध्यक्ष निलेश शिरसाठ यांनी राहुरी येथे नायब तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की राहुरी तालुक्यातील कृषी कार्यालय या ठिकाणी शेतीसंबंधीचे सर्व कामे केली जातात परंतु १०:५०मि झाले तरीही सदर कार्यालयात एकही अधिकारी आगर कर्मचारी उपस्थित नाही यामुळे सकाळपासून वाट पाहणाऱ्या शेतकरी कष्टकरी यांचे अतोनात हाल होत आहे अशी माहिती मिळताच ते स्वतः कार्यालयात जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नव्हते असे आढळून आले आपल्या कामात हलगर्जी करणाऱ्या प्रशासनाचा फुकट पगार लाटणाऱ्या अशा अधिकाऱ्या व कर्मचारी यांना ताबडतोब बर्थ पान २ वर...



# ...खांद्यावर सोपविली सदस्यत्वाची धुरा!

## अभिनंदनिय: धनंजय मुंडे यांचा पुढाकार

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालय अंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी आणि फलोत्पादन बियाणे उपसमितीच्या सदस्यपदी परळी वैजनाथ येथील गोविंदराव देशमुख, ॲड.विष्णुपंत सोळंके, अतुल मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाने याबाबतचे परिपत्रक नुकतेच जाहीर केले आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने या पदाधिकाऱ्यांची शिफारस केली होती.



केंद्र सरकारच्या केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत केंद्रीय बियाणे समिती कार्यरत असते. ही समिती राज्यनिहाय उपसमित्यांची नेमणूक करते. बियाणे कायदा, १९६६ च्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य सरकारला सल्ला देणे, राज्यातील बियाणे कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे आणि राज्य सरकार/केंद्रीय पान २ वर...

# बीडचा प्राचीन इतिहास प्रेरणादायी

## डॉ.कुलकर्णी :एका क्लिकवर कळणार इतिहास

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास प्रेरणादायी आहे. बीड परिसरात अनेक प्राचीन स्थळांच्या इतिहासाची सर्वसामान्य जनतेला माहीती नाही. खंडोबा मंदिर व त्या समोरील दीपमाळांचा इतिहास माहितीपटाच्या माध्यमातून क्यु आर कोडच्या एका क्लिकमध्ये हजारो लोकांपर्यंत घेऊन जाण्याचे रचनात्मक काम इतिहासकार डॉ. सतीश साळुंके हे महावारसा समिती व जिल्हा इतिहास परिषदेच्या माध्यमातून करीत आहेत. ही बाब गौरवस्पद असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ. पी.के. कुलकर्णी यांनी केले.



बीड जिल्हा महावारसा समितीच्या सहकार्याने बीड जिल्हा इतिहास परिषदेने दीपमाळा व खंडोबा मंदिराचा माहितीपटाचा क्यु आर कोड मंदिराच्या ठिकाणी डॉ कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशित केला या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. डॉ कुलकर्णी म्हणाले की, इतिहास आणि विज्ञान याचा अत्यंत सुंदर मिलाप या उपक्रमातून झाला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खंडोबा मंदिर ट्रस्टचे ज्येष्ठ संचालक पान २ वर...

**पत्रकार परिषद** मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरोंचे आवाहन

# बौद्ध धम्म परीषदेस उपस्थित रहावे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था ,बीड व बीड येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिका यांच्या वतीने बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर मौजे शिवणी येथे ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या निमित्ताने अखिल भारतीय पाचवी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. या परिषदेस उद्घाटक म्हणून पु.भिक्खु धम्मसेवक महाथेरो (अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश भिक्खु संघ) यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून श्रीलंका येथील राष्ट्रपतीचे धार्मिक सल्लागार मा.खा.पु. भदन्त अतुरलीय रतन महाथेरो



(कोलंबो, श्रीलंका) यांची उपस्थिती असणार आहे. या धम्मपरीषदेचे अध्यक्ष पु.भिक्खु इंन्दवंस्स महाथेरो (कुशीनगर) हे असून प्रमुख धम्मदेसना पु.भिक्खु करुणानंद थेरो छत्रपती संभाजीनगर, भिक्खु डॉ.इन्दवंस्स महाथेरो कुशीनगर, पु.भिक्खु पञ्ञातीस्स थेरो सिरसाळा, पु.भिक्खु महावीरो थेरो अहमदपुर, पु.भिक्खु पञ्ञारतन थेरो विपस्सनाचार्य नांदेड, पु.भिक्खु पञ्ञाबोधी थेरो नांदेड, पु.भिक्खु धम्म सुगता नागपुर, पु.भिक्खु बुद्धघोष हिंगोली, पु.भिक्खु चंद्रमुनी हिंगोली, पु.भिक्खु पञ्ञावर्धन हिंगोली, पु.भिक्खु नागसेन छत्रपती संभाजीनगर यांची प्रमुख धम्मदेसना होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर अनिल साबळे, संगीत विभाग प्रमुख स.भु. महाविद्यालय छ. संभाजीनगर प्रो. डॉ. संजय मोहड, उपविभागीय अधिकारी माजलगाव गौरव इंगोले साहेब यांची उपस्थिती राहणार आहे. ही अखिल भारतीय पाचवी बौद्ध धम्मपरीषद प्रमुख मार्गदर्शक डॉ.भिक्खु उपगुप्त महाथेरो पुर्णा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असून धम्म परिषदेस बौद्ध उपासक, उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मुख्य संयोजक पु. भिक्खु धम्मशील थेरो हिंगोली/बीड, स्वागताध्यक्ष डॉ. सुनील सरवदे (चेअरमन माऊली मल्टीस्टेट, नाशिक) यांनी केले आहे.

या कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे राहील शनिवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.०० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामजिक पान २ वर...

# सामाजिक दायित्वातून सोडविणार समस्या!

## राजेभाऊ फड : नागापुर मार्गेश्र्वरी देवी, खंडेश्वरीची आरती

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

नवरात्रीच्या पाचव्या माळेचे औचित्य साधत काल तालुक्यातील नागापुर येथील श्री मार्गेश्र्वरी देवी व श्री खंडेश्र्वरी देवीची राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते आरती करण्यात आली. या निमित्ताने त्यांनी ग्रामस्थांशी सुसंवाद साधला, सार्वजनिक उत्सवांपासून ते लोकोपयोगी कार्यापर्यंत बरेच विषय ग्रामस्थांनी या बैठकीत मांडले. सामाजिक कार्यकर्ता या नात्याने प्रत्येक समस्या मार्गी लावण्याचा शब्दही यावेळी ग्रामस्थांना दिला.



दि.०७ रोजी युवक नेते राजेभाऊ फड यांनी नागपूरचा दौरा केला. सायंकाळच्या वेळी गावातील मनाच्या श्री मार्गेश्वरी देवी व खंडेश्वरी देवींची आरती केली. तसेच योगीराज स्वामी, हनुमंत बाप्पा, दिलीप सोळंके, भगवानराव सोळंके यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी गावातील सुनील सोळंके, कैलास सोळंके, तुकाराम सोळंके, ॲड. अर्जुन सोळंके, गोरख सोळंके, किरण सोळंके, त्रिंबक सोळंके, अनिल सोळंके, रमेश सोळंके, नारायण सातभाई, बाळासाहेब सोळंके, हनुमंत सोळंके, गणेश सोळंके, मोहन सोळंके, जिजा सोळंके यांसह अनेकांची उपस्थिती होती.